CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, १६ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १२७ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाचवे सरसंघचालक कुप्प सी. सुदर्शनजी यांचा आज जन्मदिन

जगात एकता आणायची असेल तर प्रथम भारतात एकता आणावी लागेल. हिंदुस्थानात एकता येऊ शकली तर जगात एकता येणे सहज शक्य होईल. कारण भारत हा जगाचेच छोटे रूप आहे.

– स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# शेतकऱ्यांची वीजबिल थकबाकी माफ करणार

## मुख्यमंत्र्यांची घोषणा

- विदर्भ दुष्काळमुक्त करणार
- २४ नवी धरणे उभारणार
- वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाला गती



शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करताना शेतकरी बांधव

**मुंबई, १५ जुलै**

विदर्भातील एकही जिल्हा यापुढे दुष्काळी राहणार नाही, यासाठी वैनगंगा आणि नळगंगा यांसारख्या मोठ्या योजनांमधून नद्या जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासोबतच राज्यातील शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांची वीज मोफत देण्याबरोबरच त्यांची तब्बल ४८ हजार कोटी रुपयांची जुनी वीजबिल थकबाकीही पूर्णपणे माफ केली जाणार आहे, अशी ऐतिहासिक घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईत केली. भाजपा किसान मोर्चाच्या वतीने आयोजित कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते.

विदर्भाला दुष्काळाच्या झळातून कायमचे मुक्त करण्यासाठी शासनाने अत्यंत महत्त्वाकांक्षी पावले उचलली आहेत. याअंतर्गत तब्बल २४ नवी धरणे बांधण्यात येणार असून १६ जुन्या धरणांची उंची वाढवण्याचे काम वेगाने सुरू आहे. वाया जाणारे पावसाचे पाणी अडवून ते गोदावरी आणि तापी खोऱ्यात वळवण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प राबवण्यात येत आहे. याचवर्षी ही कामे पूर्ण करण्यासाठी शासन युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. यासोबतच पश्चिम महाराष्ट्रातील पुराचे पाणी वळणबंधाऱ्यांद्वारे मराठवाड्यात नेण्याची आणि उल्हास खोऱ्यातील पाणी उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्याला देऊन संपूर्ण राज्य दुष्काळमुक्त करण्याची मोठी योजना असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्याबद्दल राज्यभरातून आलेल्या हजारो शेतकऱ्यांनी तुतारींच्या निनादात मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, शेतकऱ्यांची पाटी कोरी व्हावी आणि त्यांनी प्रगतीचा नवा इतिहास लिहावा, या उदात्त हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या कर्जमाफीव्यतिरिक्त शेतकऱ्यांना ९५ हजार कोटी रुपयांचे साहाय्य दिले जात आहे. शेती फायद्याची करण्यासाठी गुंतवणूक वाढवणे गरजेचे असून जलयुक्त शिवार आणि मागेल त्याला शेततळे यांसारख्या योजनांचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. सौरपंप आणि सौरकृषीवाहिनी योजनांमुळे सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असून, या वर्षाच्या अखेरीपर्यंत राज्यातील शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिली जाईल, असा शब्दही त्यांनी दिला.

◂ (तभा वृत्तसेवा)

### शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज

सौरपंप आणि सौरकृषीवाहिनी योजनांमुळे सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असून, या वर्षाच्या अखेरीपर्यंत राज्यातील शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे, शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज मिळणार आहे. ■

# भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार लागू

**९९ टक्के भारतीय उत्पादनांवर शून्य शुल्क**

## उद्योग, कृषी, सेवा क्षेत्रांना लाभ

**नवी दिल्ली, १५ जुलै**

तीन वर्षांच्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार करार अखेर बुधवारपासून लागू झाला. संयुक्त अरब अमिराती आणि ऑस्ट्रेलियानंतर एखाद्या विकसित अर्थव्यवस्थेशी भारताने केलेला हा सर्वात महत्त्वाच्या व्यापार करारापैकी एक आहे. या करारामुळे ९९ टक्के भारतीय उत्पादनांवर ब्रिटनमध्ये शून्य शुल्क लागणार आहे. २४ जुलै २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या उपस्थितीत या करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते.

बहुतांश भारतीय निर्यातीला ब्रिटनच्या बाजारपेठेत शुल्कमुक्त प्रवेश मिळेल, तर ब्रिटनमधून येणाऱ्या अनेक उत्पादनांवरील आयात शुल्क हळूहळू कमी केले जाईल. यामुळे उद्योग, कृषी, सेवा क्षेत्र, एमएसएमई आणि व्यावसायिकांसाठी नवीन संधी निर्माण होणार असल्याचे माहिती वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. हा द्विपक्षीय करार केवळ **(शेवटच्या पानावर)**

### भारताला होणारे फायदे



या करारामुळे भारताच्या सुमारे ९९ टक्के निर्यातीला ब्रिटिश बाजारपेठेत शुल्कमुक्त प्रवेश मिळेल. याव्यतिरिक्त, भारतातील ब्रिटनची उत्पादने स्वस्त होतील. स्कॉच व्हिस्कीसह अनेक प्रीमियम विदेशी मद्यांवरील आयात शुल्क १५० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत कमी होईल. भारतातून ब्रिटनमध्ये स्थलांतरित होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाच वर्षांसाठी सामाजिक सुरक्षा योगदान देण्याची आवश्यकता भासणार नाही. वाहन उद्योगांनाही कर सवलत मिळेल. ■

# रेल्वे तिकीट बुकिंग होणार वेगवान





**नवी दिल्ली, १५ जुलै**

भारतीय रेल्वेने ऑनलाईन तिकीट बुकिंग प्रणालीचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) ने आपल्या नवीन वेबसाईटची बीटा आवृत्ती जनतेसाठी सुरू केली आहे. या बीटा आवृत्तीद्वारे, प्रवासी वेबसाईटच्या नवीन डिझाइन आणि वैशिष्ट्यांचा अनुभव घेऊ शकतील आणि आपल्या सूचना देऊ शकतील.

नवीन वेबसाईटची बीटा आवृत्ती https://www.irctc.co.in/eticket/ येथे उपलब्ध असेल. रेल्वे मंत्रालयानुसार, वेबसाईटमधील अनेक महत्त्वाच्या सुधारणा जयपूर येथील एमएनआयटीच्या विद्यार्थ्यांच्या सूचनांवर आधारित करण्यात आल्या आहेत. सध्याची आयआरसीटीसी वेबसाइट २००२ मध्ये सुरू करण्यात आली होती. सध्या त्यावर दररोज सरासरी १.४५ दशलक्ष तिकीट बुकिंग होते. नवीन बेबसाईटमुळे आता प्लॅटफॉर्म तिकिटांसाठी रांगेत उभे राहण्याची गरज नाही, घरबसल्या आरामात ऑनलाईन बुकिंग करता येईल. तसेच तिकीट बुकिंग प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या कमी करण्यात आली आहे. त्यामुळे चेकआउट आणखी जलद झाले आहे. प्रवाशांची जतन केलेली माहिती आधीच उपलब्ध असेल, तर त्यांना त्यांचे तपशील पुन्हा भरण्याची गरज भासणार नाही.

◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### तणावानंतरही 'निफ्टी' २४,००० पार

**मुंबई :** जागतिक बाजारपेठेतून मिळालेल्या सकारात्मक संकेतांच्या बळावर भारतीय शेअर बाजारात बुधवारी जोरदार तेजी पाहायला मिळाली. अमेरिकेतील महागाई दरात अनपेक्षित घट झाल्याने फेडरल रिझर्व्हकडून होणाऱ्या संभाव्य व्याजदरवाढीची शक्यता आता धूसर झाली आहे. या सकारात्मक घडामोडीमुळे जागतिक स्तरावर गुंतवणूकदारांमध्ये नवा उत्साह संचारला. याचा थेट फायदा देशांतर्गत बाजाराला मिळाला आणि व्यवहाराच्या सुरुवातीला सेन्सेक्स व निफ्टीने उच्चांकी कामगिरी नोंदवली. मात्र, दिवसभराच्या सत्रात मिळालेली ही मोठी वाढ बाजाराला अखेरपर्यंत टिकवून ठेवता आली नाही. तेजीच्या शिखरावर पोहोचल्यानंतर गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर नफावसुली सुरू केली, ज्यामुळे बाजाराने उच्चांकी पातळीवरून घसरण अनुभवली. दिवसभरातील चढ-उतारांनंतरही राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी ५०' महत्त्वपूर्ण अशा २४,००० च्या पातळीच्यावर राखण्यात यशस्वी ठरला. कालच्या सत्रात निफ्टीने २४,२०० चा टप्पा पार केला होता, परंतु नफावसुलीच्या दबावामुळे तो २४,०७८.५० वर स्थिरावला. ■

**ताज्या घडामोडी**
क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# इराणची दाणादाण; ५८ ठार

## पायाभूत सुविधा-निवासी इमारतींवर हल्ले, अडीचशे जखमी



अमेरिकेच्या हल्ल्यात इराणमधील उद्ध्वस्त झालेली इमारत

**तेहरान, १५ जुलै**

अमेरिकेच्या सैन्याने इराणच्या विविध शहरांत पायाभूत सुविधा आणि निवासी भागांला लक्ष्य करत केलेल्या हल्ल्यात ५८ नागरिक ठार झाले, तर २५० हून अधिक जखमी झाल्याची माहिती इराणच्या आरोग्य मंत्रालयाने दिली. अमेरिकेच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत बुधवारी आयआरजीसीने आखाती देशातील अमेरिकन लष्करी तळावर क्षेपणास्त्रांचा मारा केला.

इराण सरकारच्या प्रवक्त्या फातिमा मोहजरानी यांनी बुधवारी सांगितले की, अमेरिकेने केलेल्या अलीकडील हवाई हल्ल्यांमध्ये ५८ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. निवासी भागांना लक्ष्य करत त्यांनी क्षेपणास्त्रांचा मारा केला, यात अनेक इमारतींचे नुकसान झाले. ढिगाऱ्यातून अडीचशेपेक्षा अधिक लोकांना बाहेर काढून रुग्णालयात हलवले. बामपूर गॅरिसन येथे अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात सात सैनिक ठार झाले, तर बामपूर येथील लष्करी छावणीचे नुकसान झाले आहे. हल्ल्यांचा उद्देश लष्करी तळावरील अतिथीगृह, सुरक्षा तपासणी नाके आणि निवासी सुविधांना लक्ष्य करून जास्तीत जास्त जीवितहानी घडवून आणणे होता. अमेरिकेच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून आयआरजीसीने आखाती देशातील लष्करी तळावर हल्ले करत त्यांच्या पायाभूत सुविधा नष्ट केल्या.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये इराणला धमकी देताना म्हटले की, वाटाघाटीच्या टेबलावर आले नाही, तर अमेरिका पुढच्या आठवड्यापासून वीज प्रकल्प व पूल नष्ट करण्यास सुरुवात करेल. चर्चेपासून पळ काढल्यास त्यांचे अस्तित्व नष्ट होईल. ◂ (वृत्तसंस्था)





# श्रीकृष्ण जन्मभूमीवर मंदिर उभारण्याचा शंखनाद

## श्रीमंत रवींद्रपुरी महाराज यांची घोषणा

### साधू-संतांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन

**हरिद्वार, १५ जुलै**

अयोध्येत श्रीराम मंदिराच्या उभारणीनंतर आता हरिद्वारच्या संतांनी श्रीकृष्ण जन्मभूमीत मंदिर उभारण्याचा संकल्प केला आहे. यासाठी मथुरा येथे आंदोलन उभारण्याची तयारी केली आहे. यांनी सांगितले की, कावड यात्रा संपल्यानंतर श्रीकृष्ण जन्मभूमीला आम्हाला मुक्त करायचे आहे आणि यासाठी लवकरच तारीख जाहीर केली जाईल, अशी माहिती अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष श्रीमंत रवींद्रपुरी महाराज यांनी दिली आहे. निरंजनी आखाड्यात झालेल्या बैठकीत संतांनी देशभरातील साधू-संतांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर, काली सेना प्रमुख स्वामी आनंद स्वरूप यांनी योगी सरकारकडे ९ ऑगस्टपूर्वी मंदिर उभारणीची तारीख जाहीर करण्याची मागणी केली. रवींद्रपुरी महाराज म्हणाले, ज्याप्रमाणे अयोध्येत साधू-संत आणि महात्मा मोठ्या संख्येने पोहोचले होते, त्याचप्रमाणे आता मथुरेतही सर्व संत-महात्मा आणि भाविक पोहोचतील.







कोस्टल रोड मुंबईतील अत्यंत महत्त्वाचा हा मार्ग असतानाही सुरक्षेची काळजी का घेण्यात आली नाही. मार्गात अडकलेल्या वाहनांमध्ये काही रुग्ण, लहान मुलं, वृद्ध असतील तर त्यांच्या सुरक्षेचं काय, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकारने याबाबत स्पष्टीकरण द्यावे. - **रोहित पवार**, आमदार, (शप गट)

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
गुरुवार १६ जुलै २०२६ 

तुकाराम मुंढे साहेबांचा, कामाचा आणि कारवायांचा धडाका पाहता त्यांच्याकडे तात्काळ शिक्षण खातेही सोपवायला हवे, असे मनापासून वाटते म्हणजे प्रायव्हेट शाळांची मनमानी, मुजोरी, बेफिकिरी, विद्यार्थ्यांची आणि पालकांचीही गळचेपी, ह्या सगळ्याला आपोआप चाप बसेल. - **अभिजित केळकर**, अभिनेता



# अमेरिकेकडून भारताची कोंडी

## । रशियन तेल खरेदी करणाऱ्यांवर शंभर टक्के शुल्क । संसदेत विधेयक सादर

**वॉशिंग्टन, १५ जुलै**

रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर दबाव आणण्याच्या रणनीतीचा भाग म्हणून अमेरिकेन सिनेटमध्ये (संसद) एक विधेयक सादर करण्यात आले. यात रशियाकडून तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या देशांवर शंभर टक्के आयात शुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. भारत, चीन, हंगेरी, स्लोव्हाकिया आणि अझरबैजान या देशांचा विधेयकात समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विधेयकाचे समर्थन केले असून, रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांची कोंडी करणे हा विधेयकाचा उद्देश आहे.

यापूर्वी विधेयकाच्या सुरुवातीच्या मसुद्यात ५०० टक्के शुल्क (टॅरिफ) लावण्याचा प्रस्ताव होता, परंतु नंतर तो कमी करून १०० टक्के करण्यात आला. हे विधेयक मंजूर झाल्यास अमेरिका पहिल्यांदाच एखाद्या देशावर तेल आयातीच्या मुद्यावर शुल्क आकारणारा जगातील पहिला देश असेल. रशियाच्या तेल व्यवसायावर आर्थिक दबाव आणणे आणि त्याची युद्ध लढण्याची क्षमता कमकुवत करणे हा विधेयकाचा उद्देश असल्याची माहिती डेमोक्रॅट पक्षाचे खासदार (सिनेटर) रिचर्ड ब्लूमंथल यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. विधेयकात १५

युरोपीय देशांना प्रस्तावित शुल्कातून सूट देण्यात आली आहे. हे देश रशियाकडून १५ टक्क्यांपेक्षा कमी नैसर्गिक वायू खरेदी करतात आणि हळूहळू त्यात कपात करत असल्याने त्यांना वगळण्यात आले. रशियन तेल खरेदीत सर्वाधिक वाटा असलेल्या देशांवर शुल्क आकारण्यात यावे असे विधेयकात नमूद आहे. यात प्रामुख्याने भारत आणि चीनचा समावेश आहे. हे विधेयक मंगळवारी डेमोक्रॅटिक सिनेटर्स रिचर्ड ब्लुमेंथल आणि जीन शाहीन, तसेच रिपब्लिकन सिनेटर्स रॉजर विकर, केटी ब्रिट आणि दोन्ही पक्षांच्या डझनहून अधिक खासदारांनी सादर केले. ◂ (वृत्तसंस्था)



### दोन्ही सभागृहांची मंजुरी आवश्यक

अमेरिकन राजकारणात याला 'बायपार्टिसन बिल' म्हटले जाते. याचा अर्थ असा प्रस्ताव ज्यावर सत्ताधारी पक्ष आणि विरोधक दोन्ही सहमत असतात. जेव्हा दोन्ही पक्ष एखाद्या विधेयकाच्या बाजूने उभे राहतात, तेव्हा ते कॉंग्रेसमधून मंजूर होण्याची शक्यता खूप वाढते. विधेयकाला कायदा बनण्यासाठी सिनेट आणि प्रतिनिधी सभा (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज) या दोन्ही सभागृहांकडून मंजुरी मिळवावी लागेल. ■

### संघर्षाची क्षमता कमकुवत करणार

विधेयकात रशियाच्या ऊर्जा उद्योग, वित्तीय संस्था, संरक्षण औद्योगिक रचना, ओलिगार्क्स, व्यावसायिक आणि राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावरही निर्बंध लादण्याचा प्रस्ताव आहे. याव्यतिरिक्त, रशियाच्या शॅडो टँकर ताफ्याला, सेंट्रल बँक ऑफ द रशियन फेडरेशनला आणि सरकारी ऊर्जा प्रकल्पांनाही निर्बंधांच्या कक्षेत आणले आहे. सिनेटमध्ये सादर झालेल्या 'रशिया-विरोधी टॅरिफ' विधेयकाला रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट, दोन्ही पक्षांचा पाठिंबा असल्याचे ब्लूमंथल यांनी सांगितले. ■

### भारतावर काय परिणाम होईल?

इराणविरोधात संघर्षामुळे होर्मुझ जलमार्गात जहाजांची वाहतूक विस्कळीत झाल्याने आणि तेलाचा पुरवठा बाधित झाल्याने भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेलाची आयात वाढवली. तेलाची गरज पूर्ण करण्यासाठी अमेरिकेने रशियावरील निर्बंध उठवले होते. त्यानंतर रशियाकडून होणाऱ्या तेल आयातीत प्रचंड वाढ झाली. अमेरिकेने शुल्क आकारण्याची अंमलबजावणी केल्यास भारताच्या जीडीपीमध्ये ०.५ टक्क्यांची घट होऊ शकते. औषधनिर्माण, वस्त्रोद्योग आणि आयटी सेवा यासारख्या प्रमुख क्षेत्रांवर याचा सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. ■

# न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावेच लागेल

## शेख हसीनांच्या टिप्पणीवर बांगलादेश सरकारची स्पष्टोक्ती





**ढाका, १५ जुलै**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या मायदेशी परतण्याच्या घोषणेचे आम्ही स्वागत करतो. त्यांना देशात परतताच न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागेल. हसीना यांनी परतताना जगातील सर्वोत्तम वकील आपल्यासोबत घेऊन यावे. कारण, मृत्यूदंडाची शिक्षा झालेल्या दोषीच्या रूपात त्यांना कायदेशीर आणि न्यायालयीन प्रक्रियेचा सामना करावा लागेल. त्यांना मृत्यूदंड देण्यात यावा, अशी देशातील नागरिकांची असल्याचे पंतप्रधान तारिक रहमान यांचे सल्लागार झाहिद उर रहमान यांनी म्हटले आहे.

हसीना यांच्या निर्णयाचे स्वागत करताना रहमान यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आम्ही हसीना यांच्या घोषणेचे स्वागत करतो. कारण आम्हाला न्याय सुनिश्चित करायचा आहे. देशातील जनतेची इच्छा आहे की, हसीना यांना त्यांच्या गुन्ह्यांसाठी सुनावण्यात आलेली फाशीची शिक्षा कायम ठेवली जावी. जनतेची हीच मागणी लक्षात घेता, त्यांच्या फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी केली जाईल. आंतरराष्ट्रीय गुन्हे लवाद न्यायालयाची संपूर्ण कार्यवाही अत्यंत पारदर्शक पद्धतीने चालवली जाईल, ज्यावर आंतरराष्ट्रीय निरीक्षक लक्ष ठेवू शकतील. न्यायालय हसीना यांच्याविरोधातील निर्णयावर पुनर्विचार करू शकते किंवा त्यांना निर्दोष मुक्तही करू शकते, अशी शक्यताही रहमान यांनी व्यक्त केली. ◂ (वृत्तसंस्था)

### सरकार कोणत्याही दबावाखाली नाही

हसीना यांच्या प्रस्तावित वापसीमुळे सरकार कोणत्याही दबावाखाली नाही. यापूर्वी २०१० मध्ये अवामी लीगच्या कार्यकाळात स्थापन झालेल्या लवाद न्यायालयाच्या निर्णयांना स्थगिती देण्याचे किंवा ते रद्द करण्याचे अनेक प्रकार घडले आहेत. प्रक्रियात्मक मुद्दे हसीना यांच्या वापसीमध्ये अडथळा ठरणार नाहीत आणि भारत या प्रकरणी चर्चा करू शकतो, असे रहमान म्हणाले. ■

### ...तर फाशी दिली जाईल

देशातील लोकांना त्यांच्या गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाची शिक्षा कायम राहावी असे वाटते, आणि तसे झाल्यास, त्यांना फाशी दिली जाईल. कारण लोकांना तेच पाहायचे आहे. दरम्यान परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, या प्रकरणी आमच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. प्रत्यार्पणाचे हे प्रकरण कायदेशीर आहे आणि त्यानुसारच त्यावर कारवाई केली जाईल. ■

# शिक्षकाने शिक्षा केल्यानंतर मुलाचा आत्महत्येचा प्रयत्न

**बंगळुरू, १५ जुलै**

शाळेतील एका किरकोळ घटनेवरून शिक्षकाने कथितरीत्या शिक्षा केल्यामुळे इयत्ता सातवीतील एका विद्यार्थ्याने आत्महत्येचा प्रयत्न केला, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. ही घटना मंगळवारी घडली आणि हे टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी त्याने आपल्या बहिणीला त्याबद्दल सांगितले होते, असे पोलिसांनी सांगितले.

हा विद्यार्थी येथील मारियप्पनपाल्या भागातील एका शाळेत शिकतो. त्याने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दुसऱ्या विद्यार्थ्याशी संबंधित एका कथित खोडकर कृत्यावरून शिक्षकाने या मुलाला खडसावले होते. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### कृती सेनन दिसली कबीर बहियासोबत

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री कृती सेनन इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना पाहण्यासाठी पोहोचली. यावेळी तिच्यासोबत तिचा कथित प्रियकर आणि व्यावसायिक कबीर बहिया देखील उपस्थित होता. दोघांना स्टेडियमच्या स्टँड्समध्ये एकत्र सामन्याचा आनंद घेताना पाहिले गेले. कृती आणि कबीर बहियाने त्यांच्या इंस्टाग्राम हँडलवर स्टेडियमचे काही फोटो शेअर केले आहेत ज्यात दोघेही एका मित्रासोबत पोज देताना दिसत आहेत. हे फोटो समाज माध्यमावर वेगाने व्हायरल होत आहेत. मागील काही महिन्यांपासून डेटिंगची चर्चा आहे. कृती सेनन आणि कबीर बहिया यांच्या नात्याच्या बातम्या अभिनेत्रीने तिचा ३४वा वाढदिवस साजरा केला होता तेव्हापासून सतत समोर येत आहेत. दोघांना अनेक प्रसंगी एकत्र पाहिले गेले आहे, मात्र दोघांकडूनही नात्याबद्दल कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. ■



### ऋतिक रोशन दिसणार विशेष कॅमिओ भूमिकेत

**मुंबई :** सुपरस्टार थलैवा रजनीकांत यांच्या आगामी 'जेलर २' चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटात बॉलिवूड अभिनेता ऋतिक रोशन विशेष कॅमिओ भूमिकेत दिसणार असल्याचे म्हटले जात आहे. ऋतिकने आपल्या भूमिकेचे चित्रीकरण पूर्ण केले असून त्यानंतर तो रजनीकांत यांच्या घरी गेल्याचे समोर आले आहे. दोघांचा एक फोटो समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. एका युजरने रजनीकांत आणि ऋतिक रोशन यांचा एकत्र फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये दोघेही एकमेकांशी संवाद साधताना दिसत आहेत. फोटोसोबत कॅप्शनमध्ये 'जेलर २'मधील कॅमिओचे चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर ऋतिकने रजनीकांत यांच्या घरी भेट दिल्याचे म्हटले आहे. हा फोटो समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. ■



### तेजश्री प्रधानने खरेदी केली मर्सिडीज कार

**मुंबई :** तेजश्री प्रधान हिने समाज माध्यमावर एक आनंदवार्ता शेअर केली आहे. तेजश्रीने तिच्या वाढदिवसाच्या महिन्यांमध्ये नवीन गाडी खरेदी केली आहे. तेजश्रीने गाडी घेऊन महिना उलटला आहे. तिने महिन्याभराने आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली आहे. तेजश्रीनं मर्सिडीज कार खरेदी केली आहे. ड्रायव्हिंग सीटवर बसून तिने स्वतःचा एक गोड फोटो शेअर केला आहे. या फोटोत गाडीचे लक्झरी इंटिरिअर आणि सनरूफ सुद्धा पाहायला मिळते आहे. तसेच, फोटोतल्या गाडीच्या स्टिअरिंगवर मर्सिडीज कारचा लोगो दिसतो आहे. तेजश्री आरामात तिच्या गाडीच्या ड्रायव्हिंग सीटवर बसलेली दिसते आहे. पिस्ता रंगाच्या साडीत तेजश्री खूपच सुंदर दिसते आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, तेजश्रीची नवीकोरी आलिशान गाडी तिने स्वतःला दिलेले बर्थडे गिफ्ट आहे. ■



# मोदींच्या हस्तक्षेपामुळे टळला अणुहल्ला

## । पोलंडच्या उपपरराष्ट्र मंत्र्यांचा खुलासा । पंतप्रधानांचे कौतुक

**वॉर्सा, १५ जुलै**

युद्धाच्या पहिल्या टप्प्यात रशियाने युक्रेनची राजधानी कीव्ह शहरावर अणुहल्ला करण्याची तयारी केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेऊन पंतप्रधान मोदी यांनी त्यांची समजूत घातली. मोदींनी हस्तक्षेप केल्यामुळेच रशियाने अणुहल्ल्याची योजना मागे घेतली आणि हजारो नागरिकांचे प्राण वाचले, असा खुलासा पोलंडचे उपपरराष्ट्र मंत्री व्लादिस्लाव थिओफिल बार्टोशेवेस्की यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीतून केला.

पंतप्रधान मोदी यांच्यामुळेच युक्रेन बेचिराख होण्यापासून आणि जग अण्वस्त्र हल्ल्यापासून बचावले. २०२२ च्या अखेरीस युक्रेनमध्ये



राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना सामरिक अण्वस्त्रांचा वापर करण्यापासून रोखण्यात पंतप्रधान मोदींनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे बार्टोशेवेस्की यांनी म्हटले. रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यासाठी पंतप्रधान मोदीच मध्यस्थी करू शकतात असाही दावा त्यांनी केला. अलिप्त राष्ट्र म्हणून भारताचे रशिया आणि पूर्वीच्या सोव्हिएत युनियनसोबत दीर्घकाळचे संबंध आहेत. मोदी हे अशा मोजक्या जागतिक नेत्यांपैकी एक आहेत, ज्यांचा सल्ला पुतीन गांभीर्याने घेतात.

सप्टेंबर २०२२ मध्ये उझबेकिस्तानमधील शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेदरम्यान पुतीन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मोदींनी आजचे युग हे युद्धाचे नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. त्यांनी संघर्षाऐवजी संवाद आणि मुत्सद्देगिरीचा मार्ग अवलंबण्याचे आवाहन केले. मोदींनी पुतीन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की या दोघांशीही संपर्क कायम ठेवला आहे. त्यांच्या हस्तक्षेपामुळे युक्रेनमध्ये मोठा विध्वंस टळला.

युद्धाच्या दुसऱ्या टप्प्यात युक्रेनला युरोपीयन देशांनी शस्त्रांचा पुरवठा सुरू केल्याने रशियावरील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. दोन्ही देशांमधील युद्ध सुरू होवून साडेचार वर्षे झाली आहेत. युक्रेनने प्रतिहल्ले वाढवल्याने रशियापुढे आता इंधन टंचाई निर्माण झाल्याने पुतिन यांच्यापुढील संकट वाढले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### भारताच्या भूमिकेचे समर्थन

रशियासोबतचा ऊर्जा व्यापार कमी करण्यासाठी अमेरिका आणि युरोपीय देशांकडून सातत्याने दबाव असूनही भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात कच्चे तेल खरेदी करणे सुरूच ठेवले. भारताने नेहमीच आपली तेल खरेदी ही ऊर्जा सुरक्षा आणि राष्ट्रीय हितासाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आणि हे योग्यच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. इराण युद्धाच्या संदर्भातही बार्टोशेवेस्की यांनी भारताच्या भूमिकेचे समर्थन केले. ■

# ममता बॅनर्जींना धक्का; मदन मित्रांचा राजीनामा

**कोलकाता, १५ जुलै**

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला आहे. आमदारांच्या बंडानंतर आणि २० खासदारांच्या फुटीनंतर त्यांच्या पाठीशी उभे राहिलेले मदन मित्रा आता ऋतब्रता बॅनर्जी यांच्या गटात सामील झाले आहेत. बुधवारी, मदन मित्रा यांनी तृणमूल काँग्रेसच्या सर्व पदांचा राजीनामा देत ऋतब्रता बॅनर्जी यांना पाठिंबा जाहीर केला. अंमलबजावणी संचालनालयाकडून (ईडी) समन्स मिळाल्यानंतर मदन मित्रा यांनी हा निर्णय घेतला.



विशेष म्हणजे, एक दिवसापूर्वीच अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पालिका भरती घोटाळ्याप्रकरणी मदन मित्रा यांचे दोन मुले आणि पत्नीला समन्स बजावण्यात आले होते. मदन मित्रा सध्या कामरहाटी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. ते मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि सरचिटणीस होते.

मित्रा यांनी पश्चिम बंगाल सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणूनही काम पाहिले असून, क्रीडा आणि वाहतूक यांसारखी महत्त्वाची मंत्रालये सांभाळली आहेत. पक्षांतर्गत बंडानंतर मदन मित्रा महत्त्वाच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी ममता बॅनर्जी यांच्या कालीघाट येथील निवासस्थानी वारंवार भेट देत असत. ◂ (वृत्तसंस्था)

# नेपाळमध्ये भारताकडून मठाची पायाभरणी

**काठमांडू, १५ जुलै**

नेपाळच्या सोलुखुंबू जिल्ह्यात भारतीय मदतीने एका मठाच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. लिखू पाईक ग्रामीण नगरपालिकेत मंगळवारी या मठाची पायाभरणी करण्यात आली. सोलुखुंबू हे एव्हरेस्टचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. शेजारील देशात तळागाळातील पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करण्यासाठी भारताचा हा सहावा 'हाय इम्पॅक्ट कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोजेक्ट' आहे. या मठाच्या बांधकामासाठी भारत ३३ दशलक्ष नेपाळी रुपयांची मदत देत आहे.

काठमांडू येथील भारतीय दूतावासाने या प्रकल्पाबद्दल माहिती दिली आहे. मंगळवारी लिखू पाईक ग्रामीण नगरपालिकेच्या अध्यक्षा मीना कार्की बसनेत आणि भारतीय दूतावासाचे द्वितीय सचिव अजय कुमार सिंह यांच्या हस्ते मठाच्या बांधकामाचा शिलाप्रसाद संयुक्तपणे ठेवण्यात आला. दूतावासाने एका निवेदनात म्हटले की, हा विकास प्रकल्प लिखू पाईक ग्रामीण नगरपालिकेमार्फत राबविण्यात येईल. ◂ (वृत्तसंस्था)



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी 'उबाठा'तून शिवसेनेत आलेले खासदार संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, संजय जाधव आणि भाऊसाहेब वाकचौरे यांच्याशी चर्चा केली

### इमारतीत लागलेल्या आगीत दोघांचा मृत्यू

**नोएडा, १५ जुलै**

नोएडातील गावात बुधवारी एका बहुमजली इमारतीत आग लागल्याने दोन जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. इमारतीच्या आत चार्जिंगला लावलेल्या एका इलेक्ट्रिक दुचाकीमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ही आग परिसरातील पेट्रोलवर चालणाऱ्या इतर दुचाकींपर्यंत पसरली, असे सह-पोलिस आयुक्त राजीव मिश्रा यांनी सांगितले.

या घटनेत सुमारे ५० जणांची सुटका करण्यात आली. धूर श्वासावाटे शरीरात गेल्याने एका पुरुषाला आणि महिलेला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. सेक्टर ६६ मधील मामुरा गावातील या इमारतीत अनेक कुटुंबे भाडेकरू म्हणून राहतात. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि बहुतेक रहिवाशांना बाहेर काढले. ◂ (वृत्तसंस्था)

# समुद्राखाली दडलाय् सोन्याचा प्रचंड साठा

## । सापडला जगातील सर्वांत मोठा खजिना । रोबोटिक पाणबुड्यांच्या साहाय्याने काढले नमुने

**नवी दिल्ली, १५ जुलै**

शास्त्रज्ञांनी उघड्या डोळ्यांना न दिसणारा एक खजिना शोधून काढला आहे. जपानची राजधानी टोकियोपासून ३६० किलोमीटर अंतरावर समुद्रात हा खजिना सापडला आहे. शास्त्रज्ञांनी ७०० मीटर खोलीवर सोने शोधून काढले आहे.

हे सामान्य सोने नाही. ते खडकांमध्ये अणू पातळीवर दडलेले आहे. हे संशोधन हिगाशी-ओगाशिमा कॅल्डेरा नावाच्या ठिकाणी करण्यात आले. तिथे समुद्राच्या तळाशी ज्वालामुखी आहेत. हे अदृश्य सोने या ज्वालामुखींजवळील खडकांमध्ये सापडले. या खडकांचे नमुने रोबोटिक पाणबुड्यांच्या साहाय्याने काढण्यात आले. या शोधाने भूगर्भशास्त्रज्ञांना चकित केले आहे आणि यामुळे भविष्यात जगभरात सोने शोधण्याच्या पद्धतीत पूर्णपणे बदल होऊ शकतो. पायराइट हा एक प्रकारचा लोह सल्फाइड धातू आहे. त्याची चमक आणि पिवळा रंग अगदी खऱ्या सोन्यासारखा असतो. म्हणूनच याला 'फूल गोल्ड' असेही म्हटले जाते. अननुभवी लोक अनेकदा याला खरे सोने समजतात. पण या वेळी, या दगडाने शास्त्रज्ञांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.



संशोधकांनी रोबोटिक पाणबुड्यांच्या साहाय्याने समुद्राच्या तळावरून खडकांचे नमुने गोळा केले. त्यानंतर त्यांनी प्रयोगशाळेत त्या खडकांमध्ये लहान छिद्रे पाडून सेकंडरी-आयन मास स्पेक्ट्रोमेट्रीच्या साहाय्याने त्यांची तपासणी केली. यातून वजनानुसार १.९ टक्के इतके विक्रमी उच्च सोन्याचे प्रमाण आढळून आले. सोने सामान्यतः सोन्याच्या खाणींमध्ये कण किंवा तुकड्यांच्या स्वरूपात आढळते. तथापि, समुद्राच्या खोल तळाशी आढळणारे हे सोने खूपच वेगळे आहे. हा धातू समुद्राच्या तळावरील पायराइटच्या स्फटिक जाळीमध्ये एका घन द्रावणाच्या स्वरूपात अस्तित्वात असतो. 'सायंटिफिक रिपोर्ट्स'मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनाने अनेक जुन्या समजुतींना छेद दिला. हिगाशी-ओगाशिमा कॅल्डेरा हे एक पाण्याखालील ज्वालामुखी विवर आहे. त्याच्या तळाशी सेंट्रल कोन, साउथईस्ट आणि ईस्ट साइट्स हे तीन सक्रिय जलऔष्णिक क्षेत्रे आहेत. या ठिकाणांवरून पृथ्वीच्या कवचाखालून खनिज-समृद्ध, अतिउष्ण द्रव सतत बाहेर पडतो. संपूर्ण परिसर धुराड्यांनी आणि मोठ्या सल्फाइडच्या ढिगाऱ्यांनी व्यापलेला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### स्फटिकांमध्ये लपलेला साठा

शास्त्रज्ञांना सर्वात जास्त आश्चर्य दगडांमध्ये सोने कसे आढळले, या गोष्टीचे वाटले. ते खनिजामध्ये अडकलेल्या लहान तुकड्यांच्या स्वरूपात नव्हते. उलट, ते पायराइटच्या स्फटिक रचनेत अणू-अणूने विणलेले होते. असे तेव्हाच घडते जेव्हा आर्सेनिक, शिसे आणि तांबे यांसारखे घटक उपस्थित असतात. हे घटक पायराइटच्या जाळीची रचना बदलतात. ज्यामुळे पोकळ्या निर्माण होतात आणि सोन्याच्या अणूंना स्फटिकामध्ये सामावून घेता येते, असे संशोधनात आढळले. दगडांमध्ये आर्सेनिकचे प्रमाण वाढल्याने, सोन्याची घनताही वाढली आहे. ■

## अग्रलेख

# इथेनॉलचा नीर-क्षीर विवेक

वर्तमानाच्या पलीकडे जाऊन काही दशके किंवा शतकांचे भविष्य पाहणाऱ्या माणसांना नावे ठेवणे ही मानव जातीची रीत आहे. त्याला शास्त्रज्ञ अपवाद नसतात आणि राजकीय नेतेही. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याबाबत सध्या हाच प्रकार सुरू आहे. आपल्या मुलांच्या उद्योगांसाठी त्यांनी वाहनांच्या इंधनात इथेनॉलचे मिश्रण सुरू केले इथपासून ते इथेनॉलमुळे वाहनांच्या टाक्यांना मुंग्या लागतात इथपर्यंतचे आचरट आरोप सध्या केले जात आहेत. सोशल मीडियावर तथाकथित इन्फ्लुएन्सर्स जे काही सांगतात, त्यावर विश्वास ठेवण्याची रीत आहे. मोजके अपवाद वगळता, सर्व विषयांत आपले मत दडपून सांगणारे इन्फ्लुएन्सर्स हे खरे तर पोटार्थी. त्यांना आमिष दिले की ते कुणावरही तुटून पडतात. सध्या ते गडकरींवर तुटून पडले आहेत. ज्या देशात पिढ्यानपिढ्या केवळ आयातीत जीवाश्म इंधनावर गाड्या पळवण्याची मानसिकता तयार झाली आहे, तिथे पर्यायी इंधनाचा आग्रह धरणे म्हणजे बलाढ्य जागतिक आणि देशांतर्गत व्यवस्थेला अंगावर घेणेच आहे. गडकरींनी ते केले. त्यामुळेच त्यांना लक्ष्य केले जात आहे आणि त्यामागे संघटित आणि व्यावसायिक स्वरूपाची 'पेड कँपेन' आहे. फक्त कॅमेरा धरण्यापुरते ज्ञान असलेले इन्फ्ल्युएन्सर्स आज देशाच्या ऊर्जा धोरणावर भाष्य करत आहेत. पण, खरी आग कुठे लागली आहे, हे समजून घेण्यासाठी आपल्याला या विषयाच्या मुळाशी जावे लागेल आणि इथेनॉलचा नीर-क्षीर विवेक समजून घ्यावा लागेल.

जग ज्या गतीने धावते आहे, तिचा विचार केला तर पृथ्वीच्या पोटातील कच्च्या तेलाचा साठा फार काळ पुरणार नाही. भारतासाठी त्याहून मोठी चिंतेची बाब म्हणजे इंधन परावलंबिता. त्याचे भोग आपण इराण-अमेरिका युद्धाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या परिस्थितीत भोगत आहोतच. भारताला लागणारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. दरवर्षी लाखो कोटी रुपयांची परकीय गंगाजळी तेल खरेदीसाठी खर्ची पडते. उद्या भू-राजकीय परिस्थिती अधिक बिघडली तर इंधनाच्या मुद्यावर भारताच्या विकासाचा रथ चिखलात रुतू शकतो. अशा स्थितीत इंधन सुरक्षा हे देशाच्या सुरक्षेचे उपकरण ठरणार आहे. जे देश स्वतःचे इंधन स्वतः तयार करू शकत नाहीत, त्यांचे भवितव्य नेहमीच इतरांच्या दावणीला बांधलेले असते. गडकरी नेमका हाच धोका ओळखून गेली दोन दशके ओरडून सांगत आहेत आणि त्यांच्या या सांगण्याला पृष्ठभूमी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाचवे सरसंघचालक मा. सुदर्शनजी यांनी गडकरींना या विषयात पुढाकार घेण्यास सांगितले होते. मा. सुदर्शनजी हे स्वदेशी, जैव इंधने आणि पर्यायी इंधनांच्या माध्यमातून ऊर्जा सुरक्षिततेचे पुरस्कर्ते होते. तत्पूर्वी, अटलजींच्या मंत्रिमंडळातील पेट्रोलियम मंत्री राम नाईक यांच्याशी मा. सुदर्शनजींची चर्चा झाली होती आणि त्यातूनच जैविक इंधनाचे धोरण ठरले होते, हा सारा इतिहास आहे. ज्या काळात मा. सुदर्शनजी आणि गडकरी यांच्यात या विषयावर संवाद झाला तेव्हा गडकरी केंद्रात मंत्री नव्हते. मा. सुदर्शनजींनी दिलेला विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी गडकरींनी या विषयाचा अभ्यास व प्रचार सुरू केला. त्यांच्या पुढाकाराने इंधन क्षेत्रात मोठी क्रांती घडली. या परिवर्तनामुळे ज्यांचे धंदे धोक्यात आले, त्यांनीच गडकरींच्या विरोधात अपप्रचार करण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न सुरू केले आहेत, असा हा मामला होय. शिवाय, आरोपांची राळ उठल्यामुळे गडकरी योग्य दिशेने जात असल्याचा पुरावा मिळालेलाच आहे.

खरे तर भारतात इथेनॉलचा प्रयोग खूप उशिरा सुरू झाला. प्रगत राष्ट्रांनी हे पाऊल कित्येक दशकांपूर्वी उचलले. १९७० च्या दशकातील तेल संकटानंतर ब्राझीलने इथेनॉलवर लक्ष केंद्रित केले. आज तिथे १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या सर्रास दिसतात आणि तिथली अर्थव्यवस्था यामुळे कमालीची स्थिर झाली आहे.

अमेरिका असो की युरोपीय देश, प्रत्येकाने जीवाश्म इंधनाला पर्याय शोधून काढला आहे. पर्यायी इंधनांमध्ये वीज, हायड्रोजन, सीएनजी आणि जैव इंधने असे अनेक प्रकार असले, तरी भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी इथेनॉल हा नैसर्गिक, व्यवहार्य आणि शाश्वत इंधन सुरक्षेचा मार्ग ठरतो. इथेनॉलवर बोंबा ठोकणाऱ्यांना यातले काहीही ठावूक नाही. एक लिटर इथेनॉलसाठी १०० लिटर पाणी लागते, हा मोठा विनोदी दावा आहे. हा हिशेब ऊस शेतीच्या एकूण पाण्याच्या वापरावरून लावला जातो. पण आज तंत्रज्ञान बदलले आहे, हे लक्षात घेतले जात नाही. उसाच्या रसापासूनच नव्हे तर खराब झालेले अन्नधान्य (सडलेला तांदूळ, मका) आणि कृषी कचऱ्यापासून इथेनॉल बनवले जात आहे. या प्रक्रियेत पाण्याचा पुनर्वापर केला जातो. सुरुवातीला ई-फाईव्ह किंवा ई-टेन (५ ते १० टक्के मिश्रण) असताना इंजिनमध्ये किरकोळ बदलांची गरज होती. आता वाहन उत्पादक कंपन्या स्वतःहून ई-ट्वेंटी आणि फ्लेक्स-इंधन वापरणारे इंजिन तयार करत आहेत. हे सारे समजून घेतले तरच लक्षात येते की खरे दुखणे वेगळे आहे. दरवर्षी होणाऱ्या २३ लाख कोटींच्या तेल आयातीवर एक बलाढ्य इम्पोर्ट लॉबी जिवंत आहे. अब्जावधी रुपयांचे कमिशन, जागतिक तेल कंपन्यांचे हितसंबंध आणि देशांतर्गत मध्यस्थांची साखळी गुंतलेली आहे. अशात एखादा मंत्री २० टक्के ते १०० टक्के इथेनॉल मिश्रणाचा आग्रह धरतो, तेव्हा तेल लॉबीच्या अब्जावधींच्या धंद्याला सुरुंग लागणार असतो आणि त्यातून पोटदुखी सुरू होते. त्यामुळे ही पेड कँपेन सुरू झाली आहे आणि तिचे सर्वांत सोपे साधन बनले आहेत सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर्स. त्यांना ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग, कृषी-अर्थशास्त्र किंवा जागतिक ऊर्जा धोरणातले काहीही कळत नाही. वाचनाची सवय सुटलेली सामान्य जनताही या १५ सेकंदांच्या रिल्सवर डोळे झाकून विश्वास ठेवते हे दुर्दैव. खरे तर इथेनॉल क्रांतीचा सर्वांत मोठा फायदा कोणाला होणार असेल, तर तो शेतकऱ्यांना. शेतकऱ्यांची स्थिती सर्वांना ठावूक आहे. कृषी मालाच्या न्याय्य भावाचे वांधे आहेतच. ऊस आणि इतर धान्यांचा वापर थेट इंधन निर्मितीसाठी किंवा तत्सम मूल्यवर्धित उत्पादनासाठी होईल, तेव्हा शेतकऱ्यांना लाभ होईल. याच अर्थाने गडकरी सांगत असतात की, शेतकरी आता फक्त 'अन्नदाता' राहणार नाही, तर तो 'ऊर्जादाता' होईल. पेट्रोलचे पैसे परदेशात जाण्याऐवजी शेतकऱ्याच्या खिशात जात असतील, तर ग्रामीण भारताचे अर्थकारण किती बदलेल, याचा विचार करण्याची क्षमता या इन्फ्लुएन्सर्समध्ये असण्याची शक्यताच नाही. तसेही कोणतेही मोठे परिवर्तन सहजासहजी स्वीकारले जात नाही. भारतात संगणक आले, तेव्हा बँकिंग कर्मचाऱ्यांनी ''आमचा रोजगार जाईल'' म्हणून संप केले. आज संगणकाशिवाय देशाची कल्पना करता येते का? तीच गोष्ट इथेनॉलची आहे. परिवर्तनाचा सुरुवातीचा काळ त्रासदायक असतोच. त्रासाला घाबरून भविष्य नाकारता येत नाही. गडकरी इथेनॉलव्यतिरिक्त ग्रीन हायड्रोजन, बायो-सीएनजी, इलेक्ट्रिक हायवे आणि हवेतून चालणाऱ्या बस अशा अनेक पर्यायांवर काम करीत आहेत. भविष्यात अन्य पर्यायही येतील. तेव्हा त्यांचाही विचार होईल. गडकरी मुळात स्वयंसेवक आहेत. स्वयंसेवकाची राष्ट्रनिष्ठा त्यांच्या कामात दिसते. मा. सुदर्शनजींनी पेरलेला राष्ट्रहिताच्या विचारांचा अंकुर गडकरींच्या पुढाकारामुळे वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. त्यामुळे आता ऊर्जा क्षेत्रातील ही इंधन क्रांती पूर्णत्वास नेण्यापासून रोखणे आता कोणालाही शक्य नाही. पेड ट्रोल्स किंवा तेल लॉबीचे हितसंबंध काही काळ संभ्रम निर्माण करू शकतात, पण काळाचा महिमा मोठा असतो. क्रांतीचे वारे वाहू लागले की जुन्या भिंती कोसळतातच. त्या कोसळणार आहेत यात वाद नाही. ■

## प्रासंगिक

# पुरीच्या विशाल पथावर...

**द्रौपदी मुर्मू** (भारताच्या राष्ट्रपती)

श्री जगन्नाथांना वंदन करणाऱ्या अनेक प्रार्थना आणि स्तोत्रे माझ्या बालपणापासूनच माझ्या स्मरणात आहेत. शाळा आणि महाविद्यालयात शिकत असताना महाप्रभू जगन्नाथांची भजने गाताना मला खूपच आनंद व्हायचा. महाप्रभू आपल्या अत्यंत जवळ असल्याचे मला जाणवायचे. सध्याच्या काळात मी भजने गात नाही, पण मी रोज महाप्रभूंचे स्मरण करते आणि त्यांची भजने गुणगुणते. मला नेहमीच माझ्या जवळ महाप्रभूंच्या अस्तित्वाची जाणीव होते. कठीण काळात ते मला आधार देतात. आजही, भक्त कवी मधुसूदन राव यांनी रचलेले गीत मी गुणगुणते, ज्याच्या ओळी आहेत : 'महाप्रभू रात्रंदिवस माझ्या सोबत आहेत; याच स्मरणाने, मी नेहमीच मनापासून त्यांची उपासना करेन'.

ज्यावेळी मला आपल्या वास्तविक जीवनातील आजूबाजूच्या घडामोडींचे काही प्रमाणात आकलन होऊ लागले त्यावेळी मला महाप्रभू जगन्नाथांच्या महानतेची जाणीव झाली होती. घरी महाप्रभू जगन्नाथांबद्दल वारंवार चर्चा व्हायची. आमच्या गावातही अशा चर्चा अनेकदा होत असत. मी जेव्हा गावच्या शाळेत शिकत होते, तेव्हा भक्त सालबेग यांनी लिहिलेली 'आहे नील शैल' ही प्रार्थना नियमितपणे म्हटली जायची. आमचे शिक्षक आम्हाला महाप्रभू जगन्नाथांबद्दल खूप काही सांगायचे : पुरीमध्ये एक अवाढव्य मंदिर आहे आणि इतके भव्य मंदिर दुसरे कोणतेही नाही!

या मंदिरात महाप्रभू श्री जगन्नाथांची, त्यांची बहीण सुभद्रा आणि मोठे भाऊ बलभद्र यांच्यासोबत पूजा केली जाते. महाप्रभू जगन्नाथांचा रंग सावळा आणि डोळे गोल आहेत. सुभद्रेचा वर्ण पिवळा आहे आणि बलभद्र हे चांदण्यातील फुलासारखे पांढरे शुभ्र आहेत. एकदा तुम्ही या देवांचे दर्शन घेतले की, त्यांना कधीही विसरू शकत नाही. आमचे शिक्षक असेही सांगायचे की, जगन्नाथ हे 'महाप्रभू' आहेत, त्यांचा प्रसाद हा 'महाप्रसाद' आहे, त्यांचे मंदिर हे 'बडा देऊळ' म्हणजेच मोठे मंदिर आहे, त्यांचा मार्ग हा 'बडा दांडा' म्हणजेच विशाल पथ आहे आणि त्यांचा समुद्र हा 'महोदधी' म्हणजेच महासागर आहे. पुरुषोत्तम क्षेत्र, पुरी हे मयूरभंज जिल्ह्यातील माझ्या उपलबेडा या मूळ गावापासून खूप दूर होते. मला पुरीला जाण्याची संधी कशी मिळणार? मी मोठी झाल्यावर भुवनेश्वरला गेले आणि युनिट-२ गर्ल्स हायस्कूलमध्ये विद्यार्थिनी म्हणून प्रवेश घेतला. मी तिथे वसतिगृहामध्ये राहू लागले. त्यानंतर मला पुरी, भुवनेश्वर आणि कोणार्कला भेट देण्याची संधी मिळाली. महाप्रभू जगन्नाथांच्या माझ्या पहिल्या दर्शनाची आठवण आजही माझ्या स्मरणात आहे, ही आठवण अगदी ताजी आहे. किती ते भव्य मंदिर, किती भव्य त्या मूर्ती! हे कधी तरी विसरता येणे शक्य आहे का?

महाप्रभू जगन्नाथांची रथयात्रा कोणी विसरू शकेल का? श्री-क्षेत्रामध्ये वर्षाच्या १२ महिन्यांत १३ सण साजरे केले जातात असे म्हटले जाते. पण रथयात्रेचे वैभव काही आगळेवेगळेच असते. महाप्रभूंच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक मंदिरात गर्दी करतात. पण वर्षातून एकदा, महाप्रभू स्वतः मंदिरातून बाहेर पडतात आणि विशाल पथावरून आपल्या भक्तांना दर्शन देत गुंडिचा मंदिराकडे मार्गस्थ होतात. ३ भव्य रथांवर स्वार होऊन, चक्रराज सुदर्शनासह



तीनही देव गुंडिचा मंदिराला भेट देतात. ते तिथे ७ दिवस मुक्काम करतात आणि नंतर परततात. महाप्रभूंचा हा भव्य उत्सव अतुलनीय आहे.

माझ्या बालपणापासूनच मी महाप्रभू जगन्नाथांची भक्त आहे. ते नेहमीच माझे सर्वांत पूजनीय दैवत राहिले आहेत. माझ्या आयुष्यातील चढ-उतार तेच नियंत्रित करतात. तेच माझ्या सुख-दुःखाचा मुख्य स्त्रोत आहेत. मी माझ्या आयुष्यात अनेक संकटांचा सामना केला आहे आणि महाप्रभूंनी नेहमीच मला त्या सर्व संकटांतून बाहेर काढले आहे. शेवटी, मी त्यांचीच कन्या आहे.

जेव्हा भारताच्या राष्ट्रपती पदासाठी माझ्या उमेदवारीची घोषणा झाली, तेव्हा मी आदरपूर्वक महाप्रभूंचे स्मरण केले. मी महाप्रभूंना प्रार्थना केली, 'तुम्ही मला इतक्या उत्तुंग उंचीवर घेऊन जात आहात. मी तुम्हाला विनवणी करते की, मला प्रत्येक पाऊल उचलताना मार्गदर्शन करा आणि नेहमी माझ्या पाठीशी राहा.' त्यांनी माझी प्रार्थना ऐकली. ते नेहमीच माझ्या प्रार्थनेला प्रतिसाद देतात. जेव्हा मला राष्ट्रपती पदाची उमेदवार म्हणून दिल्लीत राहावे लागले, तेव्हाच रथयात्रा उत्सव साजरा होणार होता. त्यामुळे माझ्यासाठी पुरीला जाणे शक्य नव्हते. रथयात्रेच्या दिवशी अगदी पहाटे मी हौझ खास, दिल्ली येथील श्री जगन्नाथ मंदिरात गेले आणि महाप्रभूंचे दर्शन घेतले. माझे मन आनंदाने भरून आले. त्यांनी माझ्यावर त्यांच्या आशीर्वादाचा वर्षाव केला. पूर्ण आत्मविश्वासाने मी माझा उमेदवारी अर्ज दाखल केला. मी अत्यंत उत्साहाने निवडणूक प्रचारात भाग घेतला. २५ जुलै २०२२ रोजी राष्ट्रपती पदाची शपथ घेण्यासाठी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहाकडे जात असताना मी महाप्रभू जगन्नाथांची प्रार्थना करत होते. त्यांच्या आशीर्वादाने तो सोहळा अतिशय उत्तम प्रकारे पार पडला. राष्ट्रपती म्हणून माझ्या उद्घाटनाच्या भाषणावेळी, ते अगदी माझ्यासोबतच तिथे असल्यासारखे मला जाणवत होते.

मात्र, महाप्रभूंच्या दर्शनासाठी पुरीला जाण्याची माझ्या मनाची ओढ कायम होती. दिवस पुढे सरकत होते, पण मला पुरीला जाता येत नव्हते. माझ्या मनात विचार आला; जोपर्यंत ते स्वतः परवानगी देत नाहीत, तोपर्यंत त्यांचे दर्शन कोणाला कसे होईल! मी मनातल्या मनात त्यांची प्रार्थना केली, 'महाप्रभू, माझ्याकडून काही चूक झाली असल्यास मला क्षमा करा! पण कृपया मला पुरीला बोलवा, मला आपले दर्शन द्या.' ते 'भावाचे' म्हणजेच भावनांचे महाप्रभू आहेत. त्यांना माझ्या भावना कशा समजणार नाहीत? लवकरच, पुरी दौऱ्याचा कार्यक्रम निश्चित झाला. ती तारीख होती १० नोव्हेंबर २०२२. पुरीत पोहोचल्यानंतर, गाड्यांचा ताफा श्री मंदिराकडे मार्गस्थ झाला. जसा गाड्यांचा ताफा पुरीच्या बडा दांडावर पोहोचला, तशी मला एक विलक्षण अनुभूती आली. बडा दांडा हा श्री जगन्नाथांचा आहे. येथे कोणत्याही राजशिष्टाचाराची गरज आहे का? पुरी हे सर्व तीर्थक्षेत्रांचा राजा म्हणजेच 'क्षेत्रराज' म्हणून प्रसिद्ध आहे. महाप्रभू हे देवांचे देव आहेत. कोणताही विचार न करता मी माझी गाडी थांबवायला सांगितली. माझी गाडी थांबताच पाठीमागून येणाऱ्या इतर सर्व गाड्याही थांबल्या. काय घडत आहे हे कोणाला समजण्यापूर्वीच, मी बडा दांडावरून अनवाणी चालण्यास सुरुवात केली होती. श्री मंदिर तिथून सुमारे २ किलोमीटर अंतरावर होते. मंदिराच्या नील-चक्रावर आणि शिखरावरील पवित्र पतित पावन ध्वजावर माझे डोळे केंद्रित करून मी पुढे पुढे चालत राहिले.

मी चालत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जमलेल्या लहान मुलांचे, महिलांचे, तरुणांचे आणि वृद्धांचेही अभिवादन करत होते. माझे संपूर्ण लक्ष महाप्रभूंवर केंद्रित होते. ज्या क्षणी मी मंदिराच्या सिंहद्वाराजवळ पोहोचले, त्या क्षणी मला स्वतःवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले. तोपर्यंत मी स्वतःला विसरून गेले होते. बडा दांडा या पवित्र मार्गाच्या धुळीमध्ये साष्टांग दंडवत घालत मी महाप्रभूंना माझे विनम्र प्रणाम अर्पण केले. त्यानंतर मी मंदिरात प्रवेश केला. गाभाऱ्यात पोहोचून चारही देवांचे दर्शन घेतल्यावर मी एका दिव्य आनंदाने भारावून गेले.

महाप्रभू हे विश्वाचे रक्षक आहेत. ज्यांना सर्वांनी नाकारले आहे, त्यांचे ते तारणहार आहेत. संपूर्ण जगातील लोकांचे दुःख दूर करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. म्हणूनच त्यांच्या गोल डोळ्यांच्या पापण्या कधीही मिटत नाहीत. त्यांच्यासाठी उच्च आणि नीच असा कोणताही भेद नाही. त्यांच्या नजरेत सर्व समान आहेत आणि सर्वांची समानता हाच त्यांचा मंत्र आहे. त्यांच्या करुणेचा आशीर्वाद मिळाल्यामुळे, मी स्वतःला समाजातील प्रत्येक घटकाच्या सेवेसाठी समर्पित केले आहे. त्या गोल डोळ्यांच्या महाप्रभू जगन्नाथांकडे पाहत मी आदराने हात जोडले आणि प्रार्थना केली, 'हे महाबाहू! लोकांच्या सेवेप्रति असलेल्या माझ्या समर्पणाच्या भावनेला तुमचे आशीर्वाद सदैव बळ देवोत! हे कृपानिधी, आमच्या देशाचे आणि संपूर्ण जगाचे तुमच्या कृपेने रक्षण करा.' असे म्हणताना मी स्वतः भक्तिभावात तल्लीन झाले. ■

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गडचिरोलीचा अभिमान डॉ. प्रकाश हलामी

मोठी स्वप्ने पाहण्यासाठी मोठ्या शहरात जन्म घ्यावा लागत नाही. मोठे ध्येय आणि त्यासाठी झटणारे मन असले की दुर्गम पाड्यातूनही जगाच्या शिखरावर पोहोचता येते. या वाक्याचा जिवंत पुरावा म्हणजे गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील खरमतटोला या छोट्याशा आदिवासी पाड्यातून जागतिक संशोधन क्षेत्रात मानाचे स्थान मिळवणारे डॉ. प्रकाश एम. हलामी. गडचिरोली म्हटले की अनेकांच्या डोळ्यासमोर नक्षलवाद, दुर्गम भाग, मागासलेपण आणि विकासाच्या समस्या उभ्या राहतात. मात्र या जिल्ह्याची खरी ओळख ही इथल्या मातीत दडलेल्या जिद्दीची, कष्टाळूपणाची आणि प्रतिभेची आहे. या भूमीतून अनेक खेळाडू, अधिकारी, कलाकार घडले; आता त्याच भूमीने जागतिक दर्जाचा वैज्ञानिकही देशाला दिला आहे. ही बाब केवळ गडचिरोलीसाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची आहे.

साय-रँक ग्लोबल रजिस्ट्री-२०२५ मध्ये जगातील उत्कृष्ट पाच टक्के शास्त्रज्ञांमध्ये डॉ. प्रकाश हलामी यांची निवड झाली आहे. हा सन्मान मिळवणारे ते गडचिरोली जिल्ह्यातील पहिले संशोधक ठरले आहेत. एका आदिवासी पाड्यातील मुलाने जागतिक संशोधन विश्वात स्वतःचे स्थान निर्माण करणे ही केवळ वैयक्तिक यशोगाथा नाही, तर समाजाच्या सामूहिक क्षमतेचा पुरावा आहे. सध्या ते म्हैसूर येथील सीएसआयआर-केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था (सीएफटीआरआय) येथे वरिष्ठ वैज्ञानिक म्हणून कार्यरत आहेत. सूक्ष्मजीवशास्त्र, औद्योगिक जैवतंत्रज्ञान, अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रात त्यांनी केलेले संशोधन देशासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात चाचणी केंद्र उभारणीपासून लाखो आरटी-पीसीआर नमुन्यांच्या तपासणीपर्यंत त्यांनी दिलेले योगदान हे विज्ञान समाजाच्या सेवेसाठी कसे वापरावे, याचे उत्तम उदाहरण आहे. डॉ. हलामी यांचे संशोधन केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित राहिले नाही. त्यांनी विकसित केलेल्या जैवतंत्रज्ञान प्रक्रियांचा उद्योग क्षेत्रात वापर होत आहे. त्यांनी विकसित केलेले संशोधन तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर वैज्ञानिक समुदायासाठी उपयुक्त ठरले आहे. त्यांच्या नावावर १५० हून अधिक संशोधन निबंध, १३०० पेक्षा अधिक संदर्भ (सिटेशन्स), २०० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सादरीकरणे, तीन पुस्तके, २५ पुस्तकांमध्ये लेखन व संपादन, अनेक पीएच. डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, तसेच विविध पेटंट्स आणि नवकल्पनांमध्ये मोलाचे योगदान अशी उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी आहे. जपान, जर्मनी, अमेरिका यांसारख्या देशांतील संशोधन संस्थांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना फेलोशिप आणि विविध सन्मानांनी गौरविले आहे. पण या सर्व यशामागे कोणताही चमत्कार नाही, आहे ती फक्त शिक्षणावरची निष्ठा, कठोर परिश्रम, सातत्य आणि स्वतःवरचा अढळ विश्वास. गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात अनेक मुलांमध्ये अपार बुद्धिमत्ता आहे. गरज आहे ती योग्य संधी, सक्षम मार्गदर्शन आणि प्रेरणेची. डॉ. हलामी यांची यशोगाथा ही अशा हजारो विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण आहे. आपणही वैज्ञानिक होऊ शकतो, संशोधक होऊ शकतो, जगभरात आपल्या जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करू शकतो, हा आत्मविश्वास त्यांच्या कार्यामुळे नव्या पिढीमध्ये निर्माण होत आहे. विज्ञान म्हणजे मानवतेची सेवा. डॉ. हलामी यांनी आपल्या संशोधनातून हेच तत्त्व जपले. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक उपलब्धी म्हणून नव्हे, तर सामाजिक बांधिलकीचे आदर्श उदाहरण म्हणूनही पाहिले पाहिजे. आज गडचिरोली जिल्हा विकासाच्या नव्या वाटेवर आहे. अशा काळात डॉ. प्रकाश हलामी यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वांची यशोगाथा जिल्ह्याच्या नव्या ओळखीचा पाया ठरत आहे. नकारात्मक बातम्यांपलीकडेही गडचिरोलीकडे जगाला देण्यासारखी ज्ञानसंपदा आणि प्रतिभा आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. एका छोट्याशा आदिवासी पाड्यातून सुरू झालेला प्रवास आज जागतिक संशोधन विश्वापर्यंत पोहोचला आहे. हा प्रवास प्रत्येक विद्यार्थ्याला सांगतो-स्वप्न पाहा, शिक्षणावर विश्वास ठेवा, मेहनतीची साथ सोडू नका आणि आपल्या मातीशी नाळ कायम जोडा. डॉ. प्रकाश हलामी हे केवळ गडचिरोलीचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या कार्यामुळे गडचिरोलीचे नाव देशाच्या आणि जगाच्या वैज्ञानिक नकाशावर अभिमानाने कोरले गेले आहे. अशीच अनेक स्वप्ने या मातीतून उभी राहोत आणि ज्ञान, संशोधन व कर्तृत्वाच्या बळावर गडचिरोलीचा गौरव अधिकाधिक उंचावत राहो, हीच अपेक्षा.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# राजघाट परिसरात प्रणव मुखर्जींचे स्मारक

**श्यामकांत जहागीरदार**

राजधानी दिल्लीतील यमुना नदीच्या काठावरील राजघाट परिसरात माजी राष्ट्रपती, भारतरत्न प्रणव मुखर्जी यांचे स्मारक उभारण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. २०१२ ते २०१७ या काळात म्हणजे संपुआ सरकारच्या उत्तरार्धात आणि रालोआ सरकारच्या पूर्वार्धात मुखर्जी देशाचे राष्ट्रपती होते. मुखर्जी हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. अर्थ आणि परराष्ट्र मंत्रालयासह अनेक प्रमुख मंत्रालयांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली.

मुखर्जी अर्थमंत्री असताना डॉ. मनमोहनसिंग यांना त्यांनीच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर बनवले होते, पण नंतर डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात त्यांना अर्थमंत्री व्हावे लागले. मुखर्जी यांची संसदीय कारकीर्द प्रदीर्घ म्हणजे ५ दशकांची होती. १९६९ मध्ये पहिल्यांदा ते काँग्रेसतर्फे राज्यसभेवर निवडून आले. २००४ मध्ये पहिल्यांदा मुखर्जी पश्चिम बंगालच्या जंगीपूर मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. पंतप्रधान असलेले डॉ. मनमोहनसिंग राज्यसभा सदस्य असल्यामुळे लोकसभेतील सत्तापक्षाचे नेते म्हणून मुखर्जी यांची नियुक्ती झाली. येथूनच राजकारणातील मुखर्जी यांचे अच्छे दिन सुरू झाले. डॉ. मनमोहनसिंग सरकारच्या काळात मंत्रिमंडळाच्या बहुतांश समित्यांचे अध्यक्ष मुखर्जीच राहत होते. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर मुखर्जी यांना आपण आता पंतप्रधान होऊ शकतो, असे वाटून गेले. पण राजीव गांधी पंतप्रधान झाले. राजीव गांधी यांच्या सभोवतालच्या काही नेत्यांनी मुखर्जी यांचा राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात समावेश होऊ दिला नाही. त्यामुळे दुखावले गेलेले मुखर्जी काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रीय समाजवादी काँग्रेसची स्थापना केली. पुढे १९८९ मध्ये राजीव गांधींसोबत समझोता झाल्यानंतर त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. त्यामुळे मुखर्जी यांची राजकीय कारकीर्द पुन्हा सुरू झाली. १९९१ मध्ये नरसिंहराव यांनी त्यांना योजना आयोगाचे उपाध्यक्ष बनवले. नंतर परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. काँग्रेसने मुखर्जी यांना अनेकवेळा खासदार आणि मंत्री बनवले, पण पंतप्रधान बनण्याचे त्यांचे स्वप्न कधीच पूर्ण होऊ दिले नाही.

२०१४ मध्ये मोदी पंतप्रधान झाल्यानंतर राष्ट्रपती काँग्रेसचा आणि पंतप्रधान भाजपाचा अशीच परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे या दोघांचे जमेल का, असा प्रश्न अनेकांना पडला होता. पण मुखर्जी आणि मोदी यांची राजकारणातील केमेस्ट्री अतिशय छान जुळली. मोदींनी मुखर्जींशी जुळवून घेतले आणि मुखर्जींनी मोदीशी. २६ जानेवारी २०१९ ला मोदी सरकारने भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देत त्यांचा सन्मान केला. ३१ ऑगस्ट २०२० ला मुखर्जी यांचे दिल्लीत निधन झाले होते. त्यानंतर मुखर्जी यांचे दिल्लीत स्मारक उभारण्याची चर्चा सुरू झाली.

मुखर्जी यांच्या स्मारकाचे संकल्पचित्र केंद्रीय लोकनिर्माण विभागाने



(सीपीडब्ल्यूडी) दिल्ली शहरी कला आयोगाला सोपवले होते. या आयोगाने सुचवलेल्या दुरुस्त्या पूर्ण करून अंतिम संकल्पचित्र सीपीडब्ल्यूडीने कला आयोगाकडे पाठवले आहे. आता अंतिम मंजुरीनंतर प्रणव मुखर्जी यांच्या समाधीस्थळाचे काम राजघाट परिसरात सुरू होईल. या परिसरात असलेल्या सदैव अटल या माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या समाधीस्थळाजवळ प्रणव मुखर्जी यांचे समाधीस्थळ राहणार आहे.

२४५ एकराच्या राजघाट परिसरात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि संजय गांधी यांचा अपवाद वगळता आतापर्यंतचे बहुतांश सर्व माजी राष्ट्रपती, माजी पंतप्रधान आणि माजी उपपंतप्रधान यांचीच समाधीस्थळे आहेत. महात्मा गांधी कोणत्याही घटनात्मक पदावर नसताना त्यांची समाधी मात्र या स्थळी आहे, असे म्हणण्यापेक्षा त्यांच्या समाधीनेच हे स्थळ राष्ट्रीय समाधी स्थळ म्हणून विकसित झाले. आज परदेशातील कोणताही राष्ट्रप्रमुख वा पंतप्रधान भारतात आल्यावर त्याला राजघाटवर नेल्याशिवाय त्यांचा शासकीय दौरा पूर्ण होत नाही. १९९९ ला काँग्रेस कार्यकाळात माजी राष्ट्रपती डॉ. शंकरदयाल शर्मा यांची समाधी कर्मभूमी या नावाने राजघाट परिसरात उभारण्यात आली. त्यानंतर राजघाट परिसरात राष्ट्रीय नेत्यांची समाधी न उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय महत्त्वाच्या नेत्यांची समाधी उभारताना एका प्रोटोकॉलचे पालन करावे लागते, त्यासाठी मोठी जागा लागते, पण राजघाट परिसरात आता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे कारण यासाठी पुढे करण्यात आले. नंतर २०१३ मध्ये राजघाट परिसर राष्ट्रीय स्मृती स्थळ बनवण्याचा निर्णय घेण्यात आला. राजघाट परिसरात ज्या नेत्यांचा अन्त्यसंस्कार होईल, तेथे त्यांचा चौथरा उभारावा, छायाचित्र, तसेच त्यांच्या कार्याची माहिती देणारा फलक लावावा, असे निर्णय घेण्यात आले.

राजघाटवर ज्या राष्ट्रीय नेत्यांचा अन्त्यसंस्कार झाला, त्या नेत्यांचेच तेथे स्मारक आहे. याला अपवाद फक्त माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांचा आहे. नरसिंहराव यांचे दिल्लीत निधन झाले. मात्र त्यावेळच्या डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील संपुआ सरकारने म्हणण्यापेक्षा सोनिया गांधी



यांनी नरसिंहराव यांचा अन्त्यसंस्कार दिल्लीत होऊ दिला नाही. दिल्लीत अन्त्यसंस्कार झाला असता तर तो राजघाट परिसरात करावा लागला असता आणि नंतर तेथे नरसिंहराव यांचे स्मारकही उभारावे लागले असते, अशी भीती बहुधा सोनिया गांधी वाटत असावी. त्यामुळे सोनिया गांधींनी नरसिंहराव यांचा अन्त्यसंस्कार हैदराबादला करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना भाग पाडले.

एवढेच नाही तर काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान असतानाही सोनिया गांधींनी नरसिंहराव यांचे पार्थिव काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अन्त्यदर्शनासाठी २४ अकबर रोड या काँग्रेस मुख्यालयातही येऊ दिले नाही. मात्र त्यानंतरही दिल्लीत नरसिंहराव यांचे स्मारक उभारावे, अशी मागणी वारंवार केली जात होती.

२०१४ मध्ये केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर तत्कालीन शहरी आवास मंत्री व्यंकय्या नायडू यांनी राजघाट परिसराची पाहणी करून नरसिंहराव यांचे स्मारक उभारण्याला मंजुरी दिली. भाजपा सरकारने सोनिया गांधी आणि काँग्रेसच्या नाकावर टिच्चून राजघाट परिसरात नरसिंहराव यांचे स्मारक उभारले आणि त्याला 'ज्ञानभूमी' हे नाव दिले. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानंतर १९६४ मध्ये 'शांतिवन' हे त्यांचे स्मारक राजघाट परिसरात उभारण्यात आले. लालबहादूर शास्त्री यांचे स्मारक 'विजयघाट' या नावाने या परिसरात आहे. संजय गांधी कोणत्याही घटनात्मक पदावर नसतानाही १९८० मध्ये अपघाती निधनानंतर त्यांचा अन्त्यसंस्कार या परिसरात करण्यात आला. याच परिसरात असलेले इंदिरा गांधी यांचे स्मारक 'शक्तिस्थळ' म्हणून ओळखले जाते. चौधरी चरणसिंह यांचे स्मारक 'किसान घाट' म्हणून तर राजीव गांधी यांचे स्मारक 'वीरभूमी' म्हणून या परिसरात आहे. माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांचे स्मारक 'एकता स्थळ' म्हणून ओळखले जाते. जगजीवनराम आणि चौधरी देवीलाल या दोन माजी उपपंतप्रधानांचे स्मारकही राजघाट परिसरात आहे. माजी पंतप्रधान चंद्रशेखर आणि इंद्रकुमार यांचे स्मारकही राजघाट परिसरात आहे.

मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर माजी पंतप्रधान पी. व्ही नरसिंहराव यांचे स्मारक उभारण्यात आले, तर माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे स्मारक राजघाट परिसरात उभारण्यात येत आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक 'सदैव अटल' मोदी सरकारच्या काळात या परिसरात तयार करण्यात आले. मोदी सरकारने काँग्रेसच्या दोन ज्येष्ठ नेत्यांना न्याय दिला, त्यांचे स्मारक राजघाट परिसरात उभारण्याचा मार्ग प्रशस्त केला आहे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्र

### पावसाचा लपंडाव आणि शेतीवर संकट

खरीप हंगाम सुरू होताच शेतकरी मोठ्या आशेने पावसाची वाट पाहतो. सुरुवातीला दोन-चार दिवस चांगला पाऊस पडल्याने पेरण्यांना वेग येतो मात्र त्यानंतर पावसाचा लपंडाव सुरू झाला की पिकांवर मोठे संकट ओढवते. या बदलत्या हवामानामुळे शेती पूर्णपणे नैसर्गिक पावसावर अवलंबून राहिली असून शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. आज हवामानातील अनिश्चितता ही शेतीपुढील सर्वांत मोठी समस्या बनली आहे. पेरणीनंतर पाऊस थांबला तर बियाणे उगवत नाहीत किंवा कोवळी रोपे सुकण्याची भीती निर्माण होते. याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनावरही मोठा आघात होतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून जलसिंचन क्षेत्राचा विस्तार करणे अत्यावश्यक आहे. कालवे बंधारे, शेततळी, नाल्यांचे खोलीकरण, बोड्या, जलसाठे आणि पाणी अडवा-पाणी जिरवा यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली तर पावसावरचे अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. उपलब्ध पाण्याची साठवण आणि वितरण झाल्यास पिकांना आवश्यक वेळी पाणी देता येईल. ■

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

# सोलापूरची जलकन्या श्रावणी सूर्यवंशी हिची एशियन चॅम्पियनशिपसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

जिद्द, प्रचंड मेहनत आणि पाण्यावर हुकूमत गाजवण्याच्या अद्भूत कौशल्याच्या जोरावर येथील सुपुत्री श्रावणी सूर्यवंशी हिने पुन्हा एकदा देशाच्या क्रीडा जगतात आपला दबदबा निर्माण केला आहे. थायलंडमधील बँकॉक येथे १६ ते २५ जुलै दरम्यान होणाऱ्या १२ व्या एशियन ऐज ग्रुप चॅम्पियनशिप साठी श्रावणीची भारतीय डायव्हिंग संघात निवड झाली आहे.

या आंतरराष्ट्रीय रणसंग्रामात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ती नुकतीच बँकॉकसाठी रवाना झाली असून, संपूर्ण देशाचे डोळे आता तिच्या सुवर्णवेधाकडे लागले आहेत.

**चाचणी स्पर्धेत तिहेरी सुवर्ण**

अहमदाबाद येथील वीर सावरकर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये १७ ते १९ जून दरम्यान या स्पर्धेची अत्यंत चुरशीची निवड चाचणी पार पडली. देशभरातील आघाडीच्या खेळाडूंना तगडे आव्हान देत श्रावणीने आपल्या कौशल्याची घोडदौड कायम राखली. तिने १ मीटर, ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड डायव्हिंग या तिन्ही अत्यंत आव्हानात्मक प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून भारतीय संघातील आपले स्थान निश्चित केले.

**वयाच्या १७ व्या वर्षी ७४ पदकांची कमाई**

श्रावणीने शालेय आणि फेडरेशनच्या स्पर्धांमध्ये आजवर मिळवलेल्या यशाचा आलेख थक्क करणारा आहे. तिच्या



नावावर तब्बल ५३ सुवर्णपदकांसह ७४ पदकांचा विक्रम नोंदवला गेला आहे.

**यशाचे शिल्पकार : आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे**



श्रावणीला या यशाशिखरावर पोहोचवण्यामागे तिचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे योगदान आहे. त्यांच्या शिस्तबद्ध, कडक आणि शास्त्रोक्त प्रशिक्षणाखालीच श्रावणीने डायव्हिंगमधील अत्यंत अवघड तांत्रिक बारकावे आत्मसात केले असून, तिच्या या यशात सरांचा वाटा सिंहाचा आहे.

* **राज्य :** ३० गोल्ड, ६ सिल्वर, १ ब्रॉन्झ (एकूण ३७ पदके)
* **राष्ट्रीय :** २१ गोल्ड, ६ सिल्वर, २ ब्रॉन्झ (एकूण २९ पदके)
* **आंतरराष्ट्रीय:** २ गोल्ड, ४ सिल्वर, २ ब्रॉन्झ (एकूण ८ पदके)
* **एकूण एकत्रित कमाई:** ५३ गोल्ड, १६ सिल्वर, ५ ब्रॉन्झ = ७४ पदके

**सुवर्णपदकाची अपेक्षा**

वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा फडकवण्यासाठी सज्ज झालेल्या या गोल्डन गर्ल कडून यंदा बँकॉकच्या भूमीवरही सुवर्णपदकाची मोठी अपेक्षा आहे. श्रावणीच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल सध्या तिच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## राज्यातील ३ जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना उपसंचालकपदी पदोन्नती

**पुणे, दि. १५ जुलै-**



**मंगळवेढ्याच्या महादेव कसगवडे यांचा समावेश**

राज्यातील क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील प्रशासकीय कामकाजाला गती देण्यासाठी क्रीडा विभागाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील ३ जिल्हा क्रीडा अधिकारी, गट-अ (राजपत्रित) दर्जाच्या अधिकाऱ्यांना उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, गट-अ या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याचा आदेश शासन स्तरावरून जारी करण्यात आला आहे. क्रीडा विभागाचे उपसचिव आबासाहेब कवळे यांच्या स्वाक्षरीने १५ जुलै रोजी हा अधिकृत शासन आदेश जारी करण्यात आला. सन २०२५-२६ च्या निवडसूचीनुसार, ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे या अधिकाऱ्यांची पदोन्नती व नवीन पदस्थापना निश्चित करण्यात आली आहे. पदोन्नती व नवीन पदस्थापना लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथील महादेव कसगवडे यांची नागपूर येथे क्रीडा उपसंचालक या रिक्त पदावर पदोन्नती झाली आहे. चंद्रपूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांना अमरावती विभागाच्या क्रीडा उपसंचालक या पदावर नियुक्त करण्यात आले आहे. क्रीडा संचालनालय पुणे मुख्यालयाचे सहायक संचालक मिलिंद दीक्षित यांची लातूर विभागाच्या क्रीडा उपसंचालक या पदावर पदोन्नती झाली आहे.



## राज मेमोरियल स्कूलमध्ये राजेश कोठे यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १५ जुलै-**

जुनी मिल कंपाऊंड मुरारजी पेठे येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये स्व. राजेश कोठे यांची ६० वी जयंती विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रमुख पाहुणे लायन्स क्लब ऑफ चारिटेबल ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी रुपा सुंदराजन, महासिध्द म्हमाणे, सुवर्णा काळे, मीरा घाटगे यांच्या हस्ते व संस्थाअध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, राधिका चिलका, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा, पालक शिक्षक संघाचे अध्यक्षा शोभा कुलकर्णी, इस्माईल बागवान यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षण महर्षी स्व. विष्णूपंत कोठे, स्व. राजेश कोठे, स्व. महेश कोठे, विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कोठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून २०२५-२६ वर्षातील शाळेतील दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील ६० पालकांना एक घर एक झाड या उपक्रमांतर्गत वृक्ष वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. शाळेतील इयत्ता नर्सरी ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यानंतर शिक्षिका विनिता भोसले, मंगल जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेतील इयत्ता सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांकरिता बीज गोळे ही कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत शाळेतील विद्यार्थ्यांनी २३१ विद्यार्थ्यांनी ३ हजार बीज गोळे तयार केले. सदर कार्यशाळा पर्यावरण प्रेमी प्रवीण तळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती. सूत्रसंचालन विद्या माने यांनी केले.

# महापालिकेत हिरकणी कक्ष सज्ज

**नगरसेविकांसाठी सुविधायुक्त उपक्रम; कौन्सिल हॉल आवारात बालसंगोपनाची व्यवस्था**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

महिलांच्या सक्षमीकरणासह त्यांच्या मूलभूत गरजांचा विचार करत सोलापूर महानगरपालिकेने कौन्सिल हॉल आवारात हिरकणी कक्ष उभारला आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी येणाऱ्या महिला लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना बालसंगोपनासाठी स्वतंत्र, सुरक्षित व सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



विशेष म्हणजे, सोलापूर महापालिकेत सध्या ५० टक्के महिला नगरसेविका कार्यरत आहेत. त्यामुळे महिला लोकप्रतिनिधींच्या गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला आहे. महापालिका कौन्सिल हॉल आवारात सभागृह नेते कार्यालय शेजारी हा हिरकणी कक्ष उपलब्ध करण्यात आला आहे. सभांच्या काळात लहान बालकांसह येणाऱ्या महिला नगरसेविकांना याचा उपयोग होणार आहे. हिरकणी कक्षामध्ये आरामदायी आसनव्यवस्था, बालकांना दूध पाजण्याची व्यवस्था इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महिला सन्मान, मातृत्वाचा आदर आणि लोकप्रतिनिधींना अधिक सक्षम वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापालिकेचे हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे वाढते प्रतिनिधित्व लक्षात घेता अशा सुविधांची गरज सातत्याने व्यक्त होत होती. त्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिकेने हिरकणी कक्षाची उभारणी करून महिला लोकप्रतिनिधींसाठी संवेदनशील व सकारात्मक उपक्रम राबवल्याची भावना व्यक्त होत आहे.



## राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत संकेत लिगाडेला कांस्य पदक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

चेन्नई येथे ७ ते १० जुलै दरम्यान पार पडलेल्या ७९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय ॲक्वाटिक चॅम्पियनशिप २०२६ मध्ये सोलापूरच्या ज.रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी संकेत श्रीशैल लिगाडे (१२ वी सायन्स) याने हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात कांस्य (ब्राँझ) पदक पटकावले.

या स्पर्धेत देशभरातील विविध राज्ये आणि सैन्य दलाच्या संघांनी सहभाग घेतला होता. संकेतला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे व क्रीडा शिक्षक दशरथ गुरव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन भैय्या ठोकळ, सचिव शिल्पाताई ठोकळ व संचालक प्राचार्य दत्तात्रेय गाजरे यांच्या हस्ते संकेतचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य मोहनराव घोडके आणि प्राध्यापिका नफिसा शेख उपस्थित होत्या.

# सांगोला पेन्शनर संघटनेतर्फे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१५ जुलै -**





सांगोला तालुका पेन्शनर संघटनेच्या वतीने सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन संघटनेचे पदाधिकारी शिवानंद भरले, सुभाष फुलारी, सिद्धेश्वर धसाडे, काळापा सुतार, मल्लिकार्जुन बडदाळ, शंकर जाधव, वसंतराव दिघे, जयवंत नागणे, शंकरराव सावंत, सिद्धेश्वर झाडबुके, विलास नलवडे, दिनकर घोडके, प्रतिभा शेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक विष्णू राऊत, सिद्धेश्वर जानकर, कांताबाई इंगोले, दत्तात्रय इंगोले, अशोक पाटील, वसंत नवले, आरिफा शेख, हमजू मुलानी, संजय महाजन, अनुरथ कोळेकर, दत्तात्रय बाबर, चंद्रकांत लिगाडे, बबन पवार, रावसाहेब लेंडवे, विठ्ठल दिघे, संपत आसबे, सुरेश ढोले, सुधाकर डांगे, असलम इनामदार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवाजी बंडगर, शिवाजी करांडे, श्रीमंत वाघमारे, सदाशिव साबळे, प्रभाकर कसबे, अंबिका शिंदे, अरुण वाघमोडे, गंगाराम इमडे, एकनाथ जावीर, नामदेव भोसले, सुनंदा चव्हाण, सुशीला झाडे, सुमन सरगर, बापूसो लवटे, लक्ष्मण सावंत, रविराज शेटे, अभिमन्यू कांबळे, दत्तात्रय खामकर उपस्थित होते.

# पालिकेच्या तांत्रिक विभागात मोठे फेरबदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेतील तांत्रिक विभागात अखेर बहुप्रतीक्षित प्रशासकीय फेरबदलाला मंगळवारी मूर्त स्वरूप मिळाले. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी उपअभियंता, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता, भूमापक आदींसह ५६ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्यांचे आदेश काढले. याचबरोबर तांत्रिक संवर्गातील १३ अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर पदस्थापना देण्यात आली असून सर्व संबंधितांना तातडीने नवीन ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गेल्या दोन महिन्यांपासून तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत चर्चा सुरू होती. सामान्य प्रशासन विभागाने तयार केलेल्या याद्यांवर महापालिका पदाधिकारी आणि आयुक्त यांच्यात एकमत झाल्यानंतर अखेर या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. बदल्यांमध्ये ५६ तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश असून १३ पदोन्नत अधिकाऱ्यांची पदस्थापनाही करण्यात आली आहे. आयुक्तांच्या निर्देशानुसार प्रथम तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली होती. त्यानंतर कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती मिळालेले व्यंकटेश चौबे यांना सार्वजनिक आरोग्य अभियंता म्हणूनच कायम ठेवण्यात आले. तर कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांची नगर अभियंता विभागात बदली करण्यात आली असली तरी त्यांचे काम नगररचना कार्यालयातच सुरू राहणार आहे.

**महत्त्वाचे फेरबदल असे**

* ५६ तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या, १३ अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर पदस्थापना.
* प्रकाश दिवाणजींसह चार सहाय्यक अभियंत्यांकडे झोन कार्यालयांची जबाबदारी.
* अविनाश वाघमारे, सुनीता हिबारे, अभिजीत बिराजदार यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांच्या बदल्या.
* ४७ कायम व ९ मानधनावरील कनिष्ठ अभियंत्यांच्या बदल्या; तातडीने रुजू होण्याचे आदेश.

पदोन्नती प्रक्रियेत ४ जणांना उपअभियंता, २ जणांना कनिष्ठ अभियंता, मुख्य सफाई अधीक्षक, सफाई अधीक्षक, हेड माळी या पदांवर प्रत्येकी एक तर मुख्य आरोग्य निरीक्षक पदावर दोघांना पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानंतर काही अधिकाऱ्यांना त्याच विभागात तर काहींना अन्य विभागात पदस्थापना देण्यात आली. या बदल्यांमध्ये उपअभियंता अविनाश वाघमारे यांची नगररचना विभागाकडे, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवानजी यांची झोन कार्यालय क्रमांक १, मोहम्मद हनीफ बक्षी यांची झोन क्रमांक २, राघवेंद्र गायधनकर यांची झोन क्रमांक ७, तर शाम कन्ना यांची झोन क्रमांक ८ येथे विभागीय कार्यालय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सहाय्यक अभियंता सुनीता हिबारे यांना झोन कार्यालयातून नगर अभियंता विभागात आणण्यात आले आहे. तसेच कनिष्ठ अभियंता अभिजीत बिराजदार यांची नगर अभियंता विभागात, मानधनावरील कनिष्ठ अभियंता सागर खरोसेकर यांची सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयात, दीपक कुंभार यांची घनकचरा व्यवस्थापन विभागात, चेतन प्रचंडे यांची विभागीय कार्यालय क्रमांक ३, तर कल्याणी बिराजदार यांची सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयात बदली करण्यात आली आहे. याशिवाय ४७ कायम अभियंता व भूमापक तसेच मानधनावरील ९ कनिष्ठ अभियंत्यांच्या अंतर्गत बदल्यांचाही आदेश जारी करण्यात आला आहे.

## समृद्धी चट्टेची महाराष्ट्राच्या १५ वर्षांखालील मुलींच्या कॅम्पसाठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

येथील उदयोन्मुख महिला क्रिकेटपटू समृद्धी गणेश चट्टे हिची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित अंडर-१५ मुलींच्या क्रिकेट कॅम्पसाठी निवड झाली आहे. समृद्धी सध्या रेल्वे मैदानावरील श्री साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट क्लब येथे मुख्य प्रशिक्षक अनिल सांम्राणी यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. त्यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे समृद्धीने आपल्या खेळात सातत्यपूर्ण प्रगती करत ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. तिचे श्री साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट क्लबचे पदाधिकारी तसेच क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**Auction Notice**

Public auction of **Green Cavendish Bananas (Appx. Qty. 45000 Kg)** will be held at ICAR-NRCP, Solapur on **22/07/2026** at 11:30 AM on as is where is basis. For more details please visit our website nrcpomegranate.in.

Sd/-
SENIOR ADMINISTRATIVE OFFICER

**CHANG IN NAME**

I, hereby declare that My Old Name- **A. QADIR A JABBAR PYARE** has been changed to - **ABDUL QADIR ABDUL JABBAR PYARE**

Resi add- 223, Telangi Pachha Peth, Near Jail Road Solapur
**(Gazette Registration No. P2655345)**

**जामश्री रिअलटी लिमिटेड**
सीआयएन: L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय : फत्तेचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडी : jammill1907@gmail.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार दि. २३ जुलै २०२६ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे संध्याकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३० जुन २०२६ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीच्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
तारीख : १५.०७.२०२६
सही/-
ठिकाण : सोलापूर
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

**सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली.**
प्रधान कार्यालय: 404, खणभाग, सांगली 416 416 फोन: (0233) 2376236/37/38 (Scheduled Co-Op. Bank)
sublegal@sangliurban.bank.in | subsachiv@sangliurban.bank.in | www.sangliurban.bank.in

परिशिष्ट - २०
शाखा : कुर्डुवाडी

**स्थावर मिळकतीचा फेर जाहीर लिलाव**

**ज्याअर्थी, सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली, शाखा : कुर्डुवाडी** या धनको बँकेने खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द मे. उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन यांचेकडून महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये दावा क्र. १०१/३३१/२०२१-२२ व १०१/३२८/२०२१-२२ नुसार अनुक्रमे दिनांक ०६/१२/२०२१ व दिनांक २५/०१/२०२२ रोजीचे हुकूमनामा मिळविले आहेत.

त्याअर्थी, नोटीस देणेत येते की, मी **महावीर अनंत चौगुले, विक्री व वसूली अधिकारी,** मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील तपशीलाप्रमाणे मिळकतीचा/शेतजमीनीचा फेर जाहीर लिलाव खाली नमूद केलेल्या ठिकाणी नेमलेल्या तारखेस करीत आहे. तरी इच्छुकांनी संधीचा फायदा घ्यावा.

| थकबाकीदारांचे नांव | गांव | स्थावर मिळकतीचा तपशील (शेतजमीन) | फेर लिलाव वार व तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| श्री. कार्तिक उर्फ कार्तिकस्वामी बळीराम पाटील | सोलापूर | मौजे सांगवी बुद्रुक, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं. ११३/३/ ड क्षेत्र १.९५ हे. आर. व पो.ख. ०.०९ हे. आर. | शुक्रवार २४/०७/२०२६ | दुपारी १२.०० वा. | सांगली अर्बन को-ऑप. बँक लि.,सांगली. प्रधान कार्यालय, ४०४, खणभाग, सांगली. (वसुली विभाग) |
| श्री. प्रसाद ज्ञानदेव जाधव | सोलापूर | मौजे दहिटणे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं. ६ / ३ /ब/२ क्षेत्र २.००.०० हे. आर. | शुक्रवार २४/०७/२०२६ | दुपारी १.०० वा. | |

**टीप :** १) लिलावाच्या शर्ती व अटी वसुली अधिकारी प्रधान कार्यालय, वसुली विभाग, सांगली व शाखाधिकारी, सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली, शाखा : कुर्डुवाडी यांचेकडे कार्यालयीन वेळेत (सार्वजनिक सुट्टी सोडून) पहावयास मिळतील वरील तारखेस अथवा त्यापूर्वी बाकीदाराने कर्जबाकी पूर्णपणे भरलेंस फेर लिलाव रद्द करणेत येईल. २) लिलावात भाग घेणेसाठी डिपॉझिट रक्कम रु. ५,००,०००/- आर.टी.जी.एस.ने बँकेच्या खाली दिलेल्या खातेवर दिनांक २३/०७/२०२६ पूर्वी जमा करणेची आहे. तसेच ज्यांनी दिनांक २३/०७/२०२६ पूर्वी डिपॉझिट भरले असेल त्यांनाच लिलावामध्ये सहभाग घेता येईल. ३) ज्यांची बोली मंजूर होईल त्यांनी मंजूर बोलीपैकी २५% रक्कम दिनांक २४/०७/२०२६ रोजीच भरावी लागेल व ती न भरल्यास डिपॉझिटपोटी भरलेली रक्कम रु. ५.०० लाख जप्त (Forfit) करणेत येईल.

**Beneficiary Name: Sangli Urban Co-op. Bank ltd., Sangli., C/Account No.: 00070380003940**
**IFSC : HDFC0000007, Bank Name : HDFC Bank Ltd., Branch : Bhandarkar Road, Pune.**

ठिकाण : सांगली
तारीख :१५-०७-२०२६
शिक्का
सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली करिता,
**सही- (एम. ए. चौगुले) विक्री व वसुली अधिकारी**
**मो. +91 78880 09771**
Sun Advertising

**IN THE COURT OF HON'BLE ADDL CIVIL JUDGE INDI, AT : INDI**

OS.NO: 204 / 2022

1) **Shri Dundappa S/o Shakreppa Talawar @ Koli** ... **Plaintiff**

V/s

1) **Shri Sayabanna S/o Kallappa Talawar @ Koli & others** ...**Defendants**

**SUMMONS TO DEFENDANT**

Defendants. No1L : Smt Sunand W/o Sharanappa Koli,
Age : 40 Years, Occ: H.H. Works,
R/o: Sonnagi Tq : Jath Dist : Sangli.

**SUMMONS U/S 5 RULE 20(1A) OF C.P.C.**

Whereas the above named Plaintiff has instituted a suit against you in the above said court. You are hereby summoned to appear in this court either in person or through Advocate duly instructed by you on the date : 20/08/2026 in the forenoon to answer the claim and you are directed to produce on day all the documents upon which you intend to rely in support of your defense.

Take summons that in default of your appearance on the day fixed your appearance in above mentioned suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of the court this day.

**sd/-**
**Advocate for the Plaintiff**
**Shri, V.S.Chalawadi**
**Advocate**
**INDI-586 209, Dist: Vijayapur.**

**B.O.C.**
**Shirastedar (Admn)**
**Pri Civil Judge Indi**

Sun Advertising

**जाहीर प्रसिध्दीकरण**

अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि. कि. अर्ज नं. ३५/२०२६ नि.५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **रजनी मुकिंदा उगाले,**
वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. बाभुळगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सुरेखा सतीश खैरे,**
वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. पाचपिंपळा, ता. परंडा, जि. धाराशिव
— **अर्जदार**

विरुद्ध

**कोणी नाही** - **सा.वाला**

**अर्ज - अर्ज वारस दाखला मिळणेबाबत**

ज्या अर्थी, यातील अर्जदार वरील नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं. १ व २ यांची आई परिमळा कुंडलिक शिंदे ही दि. २६/०७/२०२१ रोजी सिव्हील हॉस्पीटल, उस्मानाबाद या ठिकाणी मयत झाली. मयत परिमळा कुंडलिक शिंदे हिस अर्जदाराशिवाय जवळचे व कायदेशीर वारस दुसरे कोणीही नव्हते व नाहीत. त्यामुळे सदर मयत परिमळा कुंडलिक शिंदे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ व २ याच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे अर्जदारांना मयत परिमळा कुंडलिक शिंदे यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे असल्याने अर्जदारांना वारस दाखला मिळणेसाठी अर्जदारांचा हा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार नं. १ व २ यांचे व्यतिरिक्त मयत परिमळा कुंडलिक शिंदे यांचे पश्चत इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा मे. कोर्टानी नेमली ता. ०७/०९/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे जाहीर प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्यानिशी दले असे.
ता. १४/०७/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,**
**कनिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी**



# स्पेन अंतिम फेरीत दाखल

## फ्रान्सवर २-० ने मात

### मिकेल ओयारझाबल, पेड्रो पोरोचा विजयी गोल



डॅलस येथे फ्रान्सविरुद्धच्या फुटबॉल विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यादरम्यान पेनॉल्टी स्पॉटवरून गोल करताना मिकेल ओयारझाबल (२१)

**डॅलस, १५ जुलै**

मिकेल ओयारझाबल आणि पेड्रो पोरोने नोंदविलेल्या गोलच्या बळावर युरोपियन विजेत्या स्पेन संघाने फिफा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली. विश्वचषकाच्या अंतिम फेरीतील स्थान निश्चित करण्यासाठी स्पेनने निराशाजनक कामगिरी करणाऱ्या फ्रान्सच्या संघावर २-० असा दणदणीत विजय मिळवित आपली छाप पाडली. स्पेनच्या पहिल्या सहभागानंतर १६ वर्षांनी, फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना खेळण्याची ही त्यांची केवळ दुसरीच वेळ असेल. आता स्पेनला विश्वचषक जिंकण्यासाठी बुधवारी रात्री इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यात होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजयी संघासोबत रविवारी रात्री अंतिम सामना खेळावा लागणार आहे.

फिफा विश्वचषकाच्या इतिहासात एकाच स्पर्धेत सहा सामन्यांत प्रतिस्पर्ध्याला गोल करण्यापासून रोखणारा स्पेन हा पहिला संघ ठरला आहे; तसेच, फ्रान्सविरुद्धच्या सामन्यात स्पेनला ज्या अपेक्षित गोलचा सामना करावा लागला (०.३), तो १९९४ मधील ब्राझील विरुद्ध स्वीडन (०.१) सामन्यांनंतर स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या लढतीत कोणत्याही संघाने नोंदवलेला सर्वात कमी आकडा होता.

लुकास डिग्नेने 'बॉक्स'मध्ये लॅमिन यामलला पाडल्यानंतर २२ व्या मिनिटाला मिळालेल्या पेनॉल्टीवर मिकेल ओयारझाबलने गोल केला; त्यानंतर उत्तरार्धात पेड्रो पोरोने एका उत्कृष्ट चालीचे गोलमध्ये रूपांतर करीत स्पेनला दोन गोलची विजयी आघाडी मिळवून दिली. डॅनी ओल्मोच्या उत्कृष्ट 'फ्लिक'नंतर पेड्रो पोरोने ५८ व्या मिनिटाला शानदार दुसरा गोल केला.

फ्रान्ससाठी परिस्थिती अधिकच बिकट झाली, कारण त्यांचा मध्य-रक्षणातील मुख्य खेळाडू विल्यम सलिबा दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर गेला. यामालने फ्रान्सच्या जाळीत चेंडू धाडलाही होता, परंतु लाइन्समॅनने 'ऑफसाइड'चा ध्वज उंचावल्यामुळे तो गोल ग्राह्य धरला गेला नाही. ही लढत स्पर्धेतील आतापर्यंतच्या कदाचित सर्वोत्तम दोन संघांमधील होती; कारण या स्पर्धेत फ्रान्स आणि स्पेन या दोन्ही संघांनी आपल्या अचूक पासिंग आणि आक्रमक खेळाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले होते. मात्र, उपांत्य सामन्यात स्पेनने फ्रान्सवर निर्विवाद वर्चस्व गाजवले व 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आघाडीवर असलेल्या किलियन एमबाप्पेसह फ्रान्सच्या त्या धोकादायक आक्रमक फळीला निष्प्रभ केले. फ्रान्सचे तिसऱ्यांदा विश्वचषकाचे स्वप्न भंग झाले. फ्रान्सने १९९८ व २०१८ मध्ये विश्वचषक जिंकले होते.

(वृत्तसंस्था)

# 'स्पेन फिफा विश्वचषक जिंकणार'

## भारताचे माजी कर्णधार क्लायमॅक्स लॉरेन्स यांचे भाकीत



गोल करताना स्पेनचा पेड्रो पोरो

**नवी दिल्ली, १५ जुलै**

स्पेन हा संघ अंतिम फिफा विश्वचषक पटकावेल आणि लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघ इंग्लंडविरुद्धच्या रोमांचक उपांत्य सामन्यात विजय मिळवेल, असे भाकीत भारताचे माजी कर्णधार क्लायमॅक्स लॉरेन्स यांनी वर्तविले आहे.

स्पेनची रणनीतिक शिस्त, तंदुरुस्ती आणि चेंडूवर ताबा राखून खेळण्याची शैली (पझेशन-बेस्ड फुटबॉल) पाहता, तेच फिफा विश्वचषक जिंकतील असे भाकीत भारताचा माजी कर्णधार क्लायमॅक्स लॉरेन्सने केले आहे.

लिओनेल मेस्सीच्या निर्णायक कौशल्यामुळे अर्जेंटिनाचा संघ उपांत्य फेरीत इंग्लंडवर मात करेल, असा विश्वास लॉरेन्सला वाटतो.

फ्रान्सविरुद्धच्या विजयातून स्पेनच्या संघाची परिपूर्णता दिसून आली; या युवा संघाने उत्कृष्ट तंदुरुस्ती आणि नैसर्गिक फुटबॉलचे प्रदर्शन केले. अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यातील उपांत्य सामना चुरशीचा होण्याची शक्यता आहे, कारण इंग्लंडकडे ज्यूड बेलिंगहॅम आणि हॅरी केन यांच्यासारखे आक्रमक खेळाडू आहेत. इंग्लंडच्या आक्रमक खेळाडूंविरुद्ध अर्जेंटिनाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझचा 'प्रीमियर लीग'मधील अनुभव निर्णायक ठरू शकतो. त्यामुळे उपांत्य फेरीच्या या कठीण लढतीत गतविजेत्या अर्जेंटिनाला लिओनेल मेस्सी विजयापर्यंत नेईल, असा विश्वासही त्याने व्यक्त केला.

माझ्या मते, स्पेनच विश्वचषक जिंकणार आहे. समोर इंग्लंड असो वा अर्जेंटिना, स्पेनच विजयी होईल, कारण या स्पर्धेत युरोपियन चॅम्पियन असलेला स्पेनचा संघ सर्वात परिपूर्ण वाटत आहे, असे लॉरेन्स ठामपणे म्हणाले.

फ्रान्स हा खूप चांगला संघ आहे, पण स्पेनने उत्कृष्ट फुटबॉल खेळला. त्यांनी 'वॉल पास'च्या साहाय्याने एक सुंदर गोल केला. हा खूप तरुण संघ आहे. त्यांची तंदुरुस्ती अप्रतिम आहे आणि ते सतत धावत राहतात. ते नैसर्गिक फुटबॉल खेळतात, असे ते म्हणाले.

**अर्जेंटिनाला मदत करणारी मेस्सीची जादू**

आता स्पेन अंतिम फेरीत इंग्लंड किंवा अर्जेंटिनाशी खेळेल. 'क्लायमॅक्स'ला अटीतटीच्या लढतीची अपेक्षा आहे, परंतु मेस्सीची उत्कृष्ट कामगिरी निर्णायक ठरू शकते, असे त्यांना वाटते. तो अतिशय चांगला फुटबॉल खेळत आहे आणि अर्जेंटिनाचा संघही एकजूट होऊन चांगली कामगिरी करत आहे. इंग्लंडचा संघही अत्यंत मजबूत आहे, त्यामुळे हा सामना कठीण असेल, असेही ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

# अटलांटात कडक सुरक्षा व्यवस्था

## सहकार्य व वैमनस्याच्या पृष्ठभूमीवर उपाययोजना



अटलांटा येथे इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या विश्वचषकाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी अर्जेंटिनाचे चाहते एकत्र जमले

**अटलांटा, १५ जुलै**

फुटबॉलच्या मैदानावरील तीव्र वैमनस्य असलेल्या इंग्लंड आणि अर्जेंटिना या दोन देशांमध्ये बुधवारी अटलांटा शहरात होणाऱ्या विश्वचषकाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी अटलांटा पोलिस विभागाने (एपीडी) सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली आहे.

१९८० आणि १९९० च्या दशकातील काही स्पर्धांना हिंसक घटनांचे गालबोट लागले होते; त्या तुलनेत यंदाचा विश्वचषक आतापर्यंत शांततेत पार पडला आहे. तरीही, अटलांटा स्टेडियमवर होणाऱ्या सात सामन्यांपैकी शेवटच्या सामन्यासाठी प्रशासन कोणतीही जोखीम पत्करायला तयार नाही.

अटलांटा पोलिस विभागाने संपूर्ण शहरात सार्वजनिक सुरक्षितता आणि सुरक्षेची व्यवस्था अधिक बळकट केली आहे. सर्वांसाठी सुरक्षित आणि आनंददायी अनुभव सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने अतिरिक्त कर्मचारी आणि संसाधने आधीच तैनात करण्यात आली आहेत आणि त्यांची धोरणात्मकरीत्या नेमणूक करणे सुरूच राहील, असे एका निवेदनात म्हटले आहे.

अटलांटातील सामन्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींचे सतत मूल्यांकन करूनच या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्याचे पोलिस विभागाने सांगितले.

इतक्या मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रमाचे नियोजन करताना आवश्यकतेनुसार बदल करणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे आणि या बदलांचा उद्देश फिफा विश्वचषकाचा अनुभव सुरक्षित आणि आनंददायी ठेवणे हाच आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

अमेरिकेत झालेल्या बैठकीत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याबाबत चर्चा करण्यात आली होती, असे अर्जेंटिनाच्या सुरक्षा मंत्री अलेजांड्रा मोंटेओलिवा यांनी सांगितले.

मोंटेओलिवा यांनी संकेत दिले की, या स्पर्धेत पहिल्यांदाच, प्रतिस्पर्धी संघांचे चाहते बुधवारी अटलांटा स्टेडियममध्ये वेगवेगळ्या प्रवेशद्वारांतून आत येतील.

**प्रक्षोभक संदेशावर बंदी**

अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यातील फुटबॉलमधील वैमनस्य विश्वचषकातील त्यांच्या मागील पाच सामन्यांतून निर्माण झाले आहे, ज्यापैकी अनेक सामन्यांमध्ये वादग्रस्त घटना घडल्या होत्या. दक्षिण अटलांटिकमधील फॉकलंड बेटे आणि दक्षिण जॉर्जिया बेटांवरून १९८२ मध्ये या दोन देशांमध्ये झालेल्या लष्करी संघर्षानंतर हे वैमनस्य अधिक तीव्र झाले; या संघर्षामध्ये ९०७ जणांचा बळी गेला होता. राजकीय किंवा वांशिक स्वरूपाचा, कोणत्याही प्रकारचा प्रक्षोभक संदेश देणाऱ्या गोष्टींच्या प्रवेशावर बंदी आहे. अशा मजकुराचे ध्वज किंवा फलक घेऊन त्यांना आत प्रवेश करता येणार नाही, असे ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

### लॉर्ड्सच्या यशामुळे महिला कसोटी क्रिकेटला चालना : शांता रंगस्वामी

**नवी दिल्ली :** लंडनच्या लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या महिलांच्या कसोटी सामन्यात इंग्लंडवर भारताने मिळविलेल्या विजयामुळे महिलांसाठी कसोटी क्रिकेटचे अधिक सामने खेळण्याची मागणी अधिक बळकट झाली आहे, असे भारताची माजी कर्णधार शांता रंगस्वामी म्हणाली. त्यांनी बीसीसीआयला विविध वयोगट स्पर्धांमध्ये कसोटी क्रिकेट पुन्हा सुरू करण्याचे आवाहनही केले. ■

# मोहनलालने घेतला सामन्याचा आनंद

**डॅलस, १५ जुलै**

संपूर्ण जगाचे लक्ष जगातील सर्वात मोठ्या क्रीडा स्पर्धांपैकी एक असलेल्या 'फिफा विश्वचषक २०२६' कडे लागले आहे आणि मल्याळम सुपरस्टार मोहनलाल हे डॅलस स्टेडियमवर उपस्थित असलेल्या फुटबॉल चाहत्यांमध्ये सहभागी झाले होते.

इंटरनेटवर व्हायरल होत असलेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये मोहनलाल हे त्यांची पत्नी सुचित्रा यांच्यासोबत स्टेडियममध्ये सामन्याचा आनंद घेताना दिसत आहेत. 'दृश्यम ३' मधील अभिनेता लाल टी-शर्ट, त्याला साजेसा गॉगल आणि पांढरी टोपी घातलेल्या अवतारात दिसत आहे. या सुपरस्टारसोबत फोटो काढण्याची संधी मिळालेल्या एका चाहत्याने सोशल मीडियावर सेल्फी शेअर करत लिहिले, "डॅलसमध्ये लालेट्टन यांच्यासोबत विश्वचषकासाठी सज्ज." ■



सामन्याचा आनंद घेताना मोहनलाल व त्याची पत्नी सुचित्रा

# अर्जेंटिनाच्या यशस्वी वाटचालीमागचे गुपित

**अटलांटा, १५ जुलै**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषकात मेस्सीच्या अर्जेंटिनाच्या यशस्वी वाटचालीमागचे गुपित उघड झाले आहे. या स्पर्धेत अर्जेंटिनाची उपांत्य फेरीपर्यंतची मजल मारण्यामागे लिओनेल मेस्सीचे गोल हे मुख्य कारण असले, तरी पडद्यामागच्या काही गोष्टींनीही अर्जेंटिना संघाला कठीण प्रसंगातही मैदानावर सर्वोत्तम कामगिरी करण्यास मदत केली आहे. असे वृत्त आहे की, अर्जेंटिना संघाने विश्वचषकासाठी कॅन्सस सिटी येथील आपल्या तळावर बीफ मागवले होते.

खेळाडूंच्या प्रशिक्षणाच्या दिनचर्येत आहार हा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. फिफा विश्वचषक विजेतेपद कायम राखणारा इतिहासातील केवळ तिसरा संघ होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अर्जेंटिनासाठी, खेळाडूंना घरच्यासारखे वातावरण मिळवून देणे अत्यंत गरजेचे आहे.

अर्जेंटिना संघाने घरून विविध प्रकारचे पारंपरिक पदार्थ मागवले होते; यामध्ये लोमो, वासिओ, एन्ट्राना, मताम्ब्रे, पेसेटो व असाडो दे तिरा या पदार्थांचा समावेश होता. अमेरिकेत प्रवेश करण्यापूर्वी कडक आरोग्यविषयक आणि सीमाशुल्क (कस्टम्स) नियमांची पूर्तता करण्यासाठी या साठ्याच्या नियोजनासाठी अनेक महिने लागले.

(वृत्तसंस्था)

# भारताचे वन-डे मालिका जिंकण्याचे लक्ष्य

## इंग्लंडसमोर पुनरागमनाचे आव्हान

**भारत-इंग्लंड दुसरा वन-डे सामना**

**स्थळ :** सोफिया गार्डन्स, कार्डिफ
**वेळ :** सायंकाळी ५.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर



हॅरी ब्रुक



शुभमन गिल

**कार्डिफ, १५ जुलै**

पहिल्या सामन्यातील दणदणीत विजयानंतर आत्मविश्वास उंचावलेला भारतीय संघ गुरुवारी सोफिया गार्डन्स येथे होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात इंग्लंडचा सामना करून तीन सामन्यांची वन-डे मालिका खिशात घालण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे, इंग्लंडवर त्वरित कामगिरी सुधारण्याचे दडपण आहे; अन्यथा, लॉर्ड्सवरील अंतिम सामन्यापूर्वीच त्यांना मालिका गमवावी लागू शकते.

पहिल्या सामन्यात (एजबॅस्टन येथे) पाहुण्या संघाने सांघिक कामगिरीच्या जोरावर सहा गडी राखून बाजी मारली. अक्षर पटेलने फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर चमक दाखविली; त्याने चार बळी घेत इंग्लंडचा तळाचा फलंदाजी क्रम कोलमडून टाकला आणि नंतर नाबाद अर्धशतक झळकावून विजयाचा पाया रचला. वॉशिंग्टन सुंदरने त्याच्या कारकिर्दीतील पहिल्या वन-डे अर्धशतकासह त्याला उत्तम साथ दिली, तर कर्णधार शुभमन गिलने सलामीला येऊन पुन्हा एकदा संयमी खेळी केली; मात्र ८० धावा केल्यानंतर दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले.

बर्मिंगहॅममधील सामन्यानंतर भारतासाठी चिंतेची एकमेव बाब म्हणजे गिलची शारीरिक स्थिती. तीव्र पेटके आल्यामुळे त्याला डावाच्या उत्तरार्धात मैदान सोडावे लागले होते, परंतु नंतर त्याने स्पष्ट केले की शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे व कठीण हवामान याला कारणीभूत होते; तसेच कार्डिफमधील सामन्यासाठी आपण उपलब्ध असू, असेही त्याने सांगितले. अलीकडच्या काही महिन्यांत सलामीवीर आणि कर्णधार म्हणून त्याने दाखवलेला दबदबा पाहता, त्याची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

मालिकेत आघाडीवर असूनही, भारतीय संघ व्यवस्थापन संघ-रचनेबाबत चर्चा करण्यात वेळ घालवू शकते. सोफिया गार्डन्सचे मैदान पारंपरिकरीत्या वेगवान गोलंदाजांना उसळी व चेंडू वळवण्यास मदत करणारे ठरले आहे, त्यामुळे डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगच्या समावेशाची शक्यता निर्माण झाली आहे. गुरनूर ब्रारने बेन डकेट आणि जेकब बेथेल यांना बाद करून आपल्या निवडीचे समर्थन केले होते, परंतु स्थानिक परिस्थितीनुसार गोलंदाजीची रणनीती आखल्यास अर्शदीपचा अतिरिक्त अनुभव निर्णायक ठरू शकतो.

(वृत्तसंस्था)

# लक्ष्य रायचंदानी द्विशतकाच्या उंबरठ्यावर



लक्ष्य रायचंदानी

**गॅले, १५ जुलै**

येथे सुरू असलेल्या १९ वर्षांखालील युवांच्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवशी श्रीलंका युवा संघाच्या ४२४ धावांना प्रत्युत्तर देताना भारताच्या युवा संघाने दिवस अखेर पहिल्या डावात ११७ षटकांत ३ बाद ३७८ धावांपर्यंत मजल मारली. सेनुजाच्या द्विशतकाच्या तोडीस तोड प्रत्युत्तर देत भारताचा सलामीवीर लक्ष्य रायचंदानी वैयक्तिक द्विशतकाच्या उंबरठ्यावर आहे. भारतीय युवा संघ अजून ४६ धावांनी पिछाडीवर आहे. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस आहे, ही स्थिती लक्षात घेता उभय युवा संघादरम्यानचा पहिला कसोटी सामना अनिर्णीत राहण्याची दाट शक्यता आहे. खेळ थांबला तेव्हा रायचंदानी नाबाद १९६ धावांवर, तर कुश पटेल नाबाद ३ धावांवर खेळत होते. रायचंदानीने ३०६ चेंडूंचा सामना करत २१ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद १९६ धावांची खेळी केली.

सेनूजा वेकुनागोडाने (२३३) झळकावलेल्या द्विशतकाच्या बळावर श्रीलंका युवा संघाने ९ बाद ४२४ धावा उभारून आपला पहिला डाव घोषित केला. त्यानंतर भारताच्या युवा संघाने त्याला चोख प्रत्युत्तर दिले. भारताने बिनबाद १८६ धावांवरून पुढे खेळताना लक्ष्य रायचंदानी व सागर विर्कने ९१.५ षटकांत २९५ धावांची सलामी भागीदारी केली. लाथेंद्र आकाशने बाद करण्यापूर्वी सागर विर्कने ३१२ चेंडूंचा सामना करत १३४ धावांची खेळी केली, यात त्याने १५ चौकार व एक षटकार खेचला. पुढे लक्ष्य रायचंदानीने एक बाजू सांभाळीत कुशाग्र ओझा (२४), कर्णधार यशवर्धन चौहान (६) व कुश पटेलच्या (नाबाद ३) साथीने भारताची धावसंख्या वाढविली.

(वृत्तसंस्था)

# भारताच्या आशांना धक्का

## लक्ष्य सेन, आयुष शेट्टी, उन्नती हुड्डाचा पराभव



लक्ष्य सेन

**टोकियो, १५ जुलै**

येथे सुरू असलेल्या 'जपान ओपन सुपर ७५०' बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी भारतासाठी निराशाजनक वातावरण राहिले. युवा खेळाडू आयुष शेट्टी आणि उन्नती हुड्डाने झुंजार खेळ केला तरी त्यांना पराभव पत्करावा लागला, तर लक्ष्य सेनला सरळ गेम्समध्ये पराभवाचा सामना करावा लागला.

'आशिया स्पर्धे'चा उपविजेता असलेल्या आयुषने पहिला गेम गमावल्यानंतर जिद्दीने पुनरागमन केले, परंतु अखेरीस त्याची दमछाक झाली. ८२ मिनिटे चाललेल्या या लढतीत त्याला थायलंडच्या दुसऱ्या मानांकित आणि माजी विश्वविजेत्या कुनलावुत विटिडसर्नकडून १९-२१, २५-२३, १५-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.

'ओडिशा ओपन सुपर १००' स्पर्धेचे दोनदा विजेतेपद पटकावणाऱ्या व जागतिक क्रमवारीत २४ व्या स्थानावर असलेल्या उन्नतीला पुन्हा एकदा हुआंग यू-हसुनकडून पराभव पत्करावा लागला. चीन तैपेईच्या या खेळाडूविरुद्धचा हा तिचा सलग दुसरा पराभव ठरला; तिला २१-१६, १६-२१, १५-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.

**भारतीय खेळाडूंची माघार**

'ऑल इंग्लंड'चा उपविजेता असलेल्या लक्ष्य सेनला स्थानिक खेळाडू कोकी वातानाबेविरुद्ध टिकून राहता आले नाही. अवघ्या ३८ मिनिटांत त्याला १६-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला. या विजयामुळे वातानाबेने लक्ष्यविरुद्धच्या विजयाच्या रेकॉर्डमध्ये सुधारणा करत ४-३ अशी आघाडी घेतली होती.

(वृत्तसंस्था)

# अक्षर पटेल अव्वल १० अष्टपैलूंच्या यादीत

**दुबई, १५ जुलै**

बर्मिंगहॅम येथे इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीनंतर, भारतीय अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेलने आयसीसी वन-डे अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत तीन स्थानांची प्रगती करत नवव्या स्थानावर धडक मारली आहे.

मंगळवारी भारताच्या सहा गड्यांनी मिळविलेल्या विजयात अक्षरने महत्त्वाची भूमिका बजावली; त्याने चार बळी घेतले आणि ५२ चेंडूंत ५७ धावांची खेळी केली. या कामगिरीमुळे, फिरकी गोलंदाज-अष्टपैलू असलेल्या अक्षरने फलंदाजीच्या क्रमवारीत १८ स्थानांची झेप घेत ७३ वे स्थान गाठले, तसेच गोलंदाजीच्या क्रमवारीत दोन स्थानांची सुधारणा करत ४२ व्या स्थानावर मजल मारली.

टी-२० मालिका ०-४ ने गमावल्यानंतर, वनडे फॉरमॅटमध्ये शुभमन गिल, जसप्रीत बुमराह, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या पुनरागमनामुळे भारतीय संघाला बळ मिळाले. ७५ चेंडूंत ८० धावा करून दुखापतीमुळे निवृत्त होण्यापूर्वी, गिलने ११ चौकार आणि एक षट्कार ठोकत इंग्लंडच्या २५९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला मजबूत स्थितीत आणले.

या कामगिरीमुळे गिलच्या रेटिंग पॉइंट्समध्ये १२ गुणांची वाढ झाली; आता तो वनडे फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या डॅरिल मिशेलपेक्षा केवळ ११ गुण मागे आहे. बुमराहच्या शानदार पुनरागम करत एक बळी घेतला व तो गोलंदाजी क्रमवारीत २४ व्या स्थानावर परतला.

वॉशिंग्टन सुंदर (५२ धावांवर नाबाद) हा आणखी एक उल्लेखनीय कामगिरी करणारा खेळाडू ठरला; त्याने फलंदाजी क्रमवारीत २४ स्थानांची (१७७ वे स्थान) आणि अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत १६ स्थानांची (५५ वे स्थान) प्रगती केली.

इंग्लंडचा उत्कृष्ट फलंदाज जो रूटनेही चांगली फलंदाजी केली; ७६ चेंडूंत ७६ धावांच्या खेळीनंतर तो पुरुषांच्या वनडे फलंदाजी क्रमवारीत संयुक्तपणे १२ व्या स्थानावर पोहोचला. त्याचप्रमाणे, लियाम डॉसनच्या आक्रमक ६८ धावांच्या खेळीमुळे त्याला क्रमवारीत ८१ स्थानांची बढती मिळाली. तो आता फलंदाजी क्रमवारीत २६२ व्या स्थानावर आहे.

(वृत्तसंस्था)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लोहाऱ्याच्या माजी विद्यार्थ्याने केली विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ जुलै -**
हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू या हायस्कूल लोहारा प्रशालेच्या ब्रीदवाक्याला साजेसा उपक्रम राबवत शाळेचे माजी विद्यार्थी तसेच शू पॅलेसचे मालक व लोहारा येथील उद्योजक गणेश रणशूर यांनी गरजू विद्यार्थ्यांना सुमारे २० हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य



भेट दिले. या मदतीचा लाभ स्वराली महेश देशमुख, सोहम राजेंद्र दरेकर आणि समर्थ बालाजी पडवळ या विद्यार्थ्यांना झाला.

यानिमित्ताने प्रशालेचे मुख्याध्यापक डी. एम. पोतदार, शिक्षक सतीश जट्टे तसेच लाभार्थी विद्यार्थ्यांच्या हस्ते गणेश रणशूर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल प्रशालेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### केशेगाव शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी निलेश जळकोटे

**इटकळ, दि.१५ जुलै -**
तुळजापूर तालुक्यातील मौजे केशेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी निलेश राजेंद्र जळकोटे तर उपाध्यक्षपदी श्रीमती शुभांगी लक्ष्मण तुरुरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी पंचायत समिती सदस्या जयश्री कोळी, उपसरपंच मल्लिनाथ महाबोले, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण क्षिरसागर, महेबुब फकीर, पोलीस पाटील कमलबाई स्वामी तसेच शाळेचे शिक्षकवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर नूतन अध्यक्ष व उपाध्यक्षांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### राजा कंपनी तरुण मंडळाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड

**तुळजापूर, दि.१५ जुलै -**
श्रीमंत राजयोगी पावणारा गणपती राजा कंपनी तरुण मंडळाच्या गणेशोत्सव नियोजन बैठकीत मंडळाचे आधारस्तंभ सज्जनराव साळुंके व अध्यक्ष विजय झाडपिडे यांच्या सहमतीने नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी गोविंद पेंदे, उपाध्यक्षपदी मंगेश साळुंके, कोषाध्यक्षपदी शुभम गाजरे, सहकोषाध्यक्षपदी हरिभाऊ साळुंके, सचिवपदी मारुती कणे, सहसचिवपदी कृष्णा जाधव आणि सोशल मीडिया प्रमुखपदी ओम साळुंके यांची निवड करण्यात आली.

### 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने दुमदुमले शहर; फुलांच्या वर्षावात भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग

# धाराशिवात संत गजानन महाराजांच्या पालखीचे जल्लोषात स्वागत






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**
गण गण गणात बोते...! या अखंड जयघोषाने बुधवारी धाराशिव नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या पवित्र पालखीचे शहरात आगमन होताच हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. पालखी मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी, आकर्षक सजावट, रांगोळ्या, टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनामाच्या घोषात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

यावेळी नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखी मार्गावरील संत ज्ञानेश्वर मंदिर परिसरात जी थ्री आर्ट यांच्या वतीने संत गजानन महाराजांच्या प्रतिमेवर आधारित आकर्षक आणि कलात्मक रांगोळी साकारण्यात आली होती. या रांगोळीने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. अनेकांनी या सुंदर कलाकृतीसमोर थांबून छायाचित्रे घेत कलाकारांच्या कौशल्याचे कौतुक केले. दरम्यान, पालखीचे शहरात आगमन होण्यापूर्वी शिवाजी चौकात स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांनी फुलांची आकर्षक सजावट करून संपूर्ण चौक भक्तिमय वातावरणाने सजविला. विविध रंगांच्या फुलांनी





पालखी मार्ग सुशोभित करण्यात आला होता. स्वागत कमानी, भगवे ध्वज, विद्युत रोषणाई आणि धार्मिक संदेशांचे फलक यामुळे शहराला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

पालखी मार्गावर टाळ-मृदंग, झांज, भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या अखंड गजराने वातावरण दुमदुमून गेले होते. महिला भाविकांनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून पालखीचे स्वागत केले, तर युवकांनी भगवे ध्वज हाती घेऊन उत्साहात सहभाग नोंदविला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. विविध सामाजिक संस्था, व्यापारी संघटना आणि सेवाभावी मंडळांनी भाविकांसाठी पिण्याचे पाणी, सरबत, अल्पोपहार आणि वैद्यकीय सेवेची व्यवस्था केली होती. पोलीस प्रशासन आणि नगरपरिषदेने वाहतूक व सुरक्षेचे उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी असूनही पालखी सोहळा शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडला.

संत गजानन महाराजांच्या पालखीच्या आगमनाने धाराशिव नगरीत श्रद्धा, सेवा, समता आणि भक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. गण गण गणात बोते... या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमून गेले असून, भाविकांसाठी हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान; चौकशी करून भरपाई द्या

### जिल्हाधिकाऱ्यांना राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**
जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी अधिकृत विक्री केंद्रातून बियाणे खरेदी करून पेरणी केली. मात्र संबंधित बियाण्यांची अपेक्षित उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने केला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत संबंधित बियाण्यांची तात्काळ चौकशी करण्यात यावी, बाधित शेतकऱ्यांच्या शेतातील पंचनामे करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे.



निवेदनात शेतकऱ्यांकडे बियाण्यांच्या पिशव्या तसेच खरेदीच्या पावत्या उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोष निश्चित करावा आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी भूमिका पक्षाने मांडली आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी बाजारात विक्री होणाऱ्या बियाण्यांच्या गुणवत्तेची कठोर तपासणी करून निकृष्ट बियाण्यांच्या विक्रीवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## बनावट दस्तऐवज प्रकरणी गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.१५ जुलै -**
येथील निबंधक कार्यालयात बनावट व दुबार दस्तऐवज तयार करून ते खरे असल्याचे भासवल्याप्रकरणी दोघांविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष दगडोबा उंबरे (रा. उंबरे कोठा, ता. जि. धाराशिव) आणि अनिल दिगंबर काळे (रा. तांबरी विभाग, धाराशिव) यांनी २८ फेब्रुवारी २०२५ रोजी मध्यवर्ती इमारतीतील निबंधक कार्यालयात दस्त क्र. ३५०७/२०२४, १७२८/२०२५, १७२९/२०२५ आणि १७३०/२०२५ संदर्भात गैरमार्गाने दुबार व बनावट दस्तऐवज तयार करून ते खरे असल्याचे भासवल्याचा आरोप आहे.

## ३६ महसूल मंडळांचा पीक विम्यात तातडीने समावेश करा

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे खासदार ओमराजे निंबाळकर यांची मागणी...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**
खरीप २०२५ हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत तांत्रिक त्रुटीमुळे वगळण्यात आलेल्या धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांचा तातडीने समावेश करून पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मंजूर करावा, अशी ठाम मागणी खा. ओमराजे निंबाळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालात संबंधित तांत्रिक त्रुटी स्पष्टपणे नमूद करण्यात आल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. राज्य शासनानेही ही बाब मान्य करून विमा कंपन्यांना पात्र शेतकऱ्यांना सात दिवसांच्या आत पीक विम्याची रक्कम अदा करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांतील हजारो शेतकरी अद्यापही या लाभापासून वंचित असल्याकडे खासदार निंबाळकर यांनी मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले आहे. निवेदनानुसार, जिल्ह्यातील धाराशिव ग्रामीण, आंबेजवळगा, पाडोळी, जेवळी, धानोरी, माकणी, अनाळा, शेलगाव, जवळा, पाचपिंपळा, सोनारी, आसू, शिराढोण आणि वाशी, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, खांडवी, आगळगाव, पांगरी, सुरडी, पानगाव, वैराग, नारी, उपळे दुमाला, सौंदरे आणि गौडगाव, तसेच लातूर जिल्ह्यातील कासारसिरशी, कासरबालकुंदा, भूतमुगळी, मदनसुरी, मातोळा, किन्नीथोट, किल्लारी, उजनी, लामजना आणि औसा या महसूल मंडळांचा प्रधानमंत्री पीक विमा योजनेत तातडीने समावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तांत्रिक कारणांमुळे कोणताही पात्र शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहू नये, तसेच शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका खा. निंबाळकर यांनी मांडली. लोकसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा सुरू राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

## नळदुर्गमध्ये मतदार यादी दुरुस्ती अभियानाचा आढावा

**बीएलओंना वेळेत व अचूक काम पूर्ण करण्याच्या सूचना**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ जुलै -**
नळदुर्ग येथे सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सघन पुनरिक्षण (SIR) अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नगरपालिकेत बीएलओंची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. अभियानातील सर्व कामे वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी बीएलओंना देण्यात आल्या.

नगरपालिका सभागृहात झालेल्या या बैठकीस नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार आणि मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत मतदार यादी दुरुस्ती (SIR) अभियानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. घरभेटी, ऑनलाइन नोंदणी, मॅपिंग तसेच मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक बीएलओने जबाबदारीने काम करावे तसेच कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत, याची विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांनी दिले.

या बैठकीस नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक अजय काकडे, सर्व बीएलओ तसेच सहाय्यक कर्मचारी मिळून एकूण ३४ जण उपस्थित होते.

## तुळजापूरात घरफोडी; साडेचार लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**
शहरातील पांडुरंग नगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ४ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी अक्षय सुरेश राक्षे (वय ३०, रा. पांडुरंग नगर, तुळजापूर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील २ लाख रुपयांची रोख रक्कम आणि ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ४ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरी करून नेला.

## अनैतिक संबंधांच्या संशयातून गळा चिरून हत्या

### येडशीजवळील कुमाळवाडी शिवारातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**
येडशीजवळील कुमाळवाडी शिवारात अनैतिक संबंधांच्या संशयातून एका ४० वर्षीय व्यक्तीची धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या केल्याप्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलिसांनी एका संशयिताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बालाजी मिटू पायघान (रा. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

१२ जुलै रोजी सायंकाळी ५.३० ते १३ जुलै रोजी सकाळी ६.३० या कालावधीत येडशी फॉरेस्टजवळील कुमाळवाडी शिवारात संतोष उर्फ दगडू बाबासाहेब देशमुख (वय ४०, रा. येडशी, ता. धाराशिव) यांचा धारदार शस्त्राने गळा चिरून खून करण्यात आल्याचा आरोप आहे. मयताची पत्नी वैशाली आणि संशयित आरोपी यांच्यात अनैतिक संबंध असल्याच्या कारणावरून ही हत्या झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी मयताचा भाऊ अजित बाबासाहेब देशमुख (वय ३५, रा. येडशी) यांनी १४ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## गुणवंतांचा गौरव; २५ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी २० हजारांची एफडी

### ज्ञानज्योती फाउंडेशन व पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने प्रेरणादायी सन्मान सोहळा...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ जुलै -**
ज्ञानज्योती फाउंडेशन, उमरगा आणि पंचायत समिती, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील विभागीय परीक्षेद्वारे व पदोन्नतीने नियुक्त अधिकारी, सेवानिवृत्त शिक्षक-मुख्याध्यापक, सेवेत कायम झालेले साधन व्यक्ती, केंद्रस्तरीय विशेष शिक्षक तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांचा गौरव व सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद धाराशिवच्या शिक्षण समितीच्या सभापती उषाताई रविंद्र गायकवाड या होत्या. कार्यक्रमाचे संयोजन पंचायत समिती उमरगाच्या सभापती ॲड. आकांक्षाताई ज्ञानराज चोगुले यांनी केले. यावेळी उपसभापती रेखा इंगळे, पंचायत समिती सदस्य महानंदा कलबुर्गे, स्नेहा जाधव, रुक्मिणी कांबळे, तुकाराम जाधव, रविंद्र हंगरगे, नगरसेविका प्रिया पवार तसेच अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन, दीपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या स्वागताने झाली. गटशिक्षणाधिकारी अमोल रजपूत यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर ॲड. आकांक्षाताई चोगुले यांनी शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी एकत्रितपणे कार्य करावे आणि आयुष्यभर विद्यार्थी वृत्ती जपावी, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात उषाताई गायकवाड यांनी शिक्षक हा समाजाचा कणा असून त्यांच्या कार्यावर देशाचे भविष्य घडत असते. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात समाजकल्याण विभागामार्फत उमरगा तालुक्यातील २५ दिव्यांग विद्यार्थ्यांच्या नावाने प्रत्येकी २० हजार रुपयांच्या मुदत ठेवी (एफडी) करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष स्वागत केले.

यानंतर विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, माजी केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती, विषय शिक्षक, विशेष कार्य करणारे शिक्षक, नवनियुक्त मुख्याध्यापक, कार्यालयीन संगणक लिपिक, डेटा एन्ट्री ऑपरेटर, वरिष्ठ लेखापाल तसेच सेवानिवृत्त शिक्षक व मुख्याध्यापकांचा शाल, पर्यावरणपूरक रोपटे, पुस्तक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुष्पलता पांढरे आणि धनराज फुरडे यांनी केले, तर शिला मुदगडे यांनी आभार मानले.

## संक्षिप्त...

### प्रा. केदार, प्रा. मद्देवाड यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ जुलै : महाराष्ट्र उदयागिरी महाविद्यालयाच्या मराठी विभागात प्रा. रामदास केदार आणि प्रा. बिभीषण मद्देवाड यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. रामदास केदार यांचे साहित्य महाराष्ट्र व गोवा राज्यांच्या शालेय अभ्यासक्रमांत निवड झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. बालभारती, महाराष्ट्राने त्यांच्या कवितेला गीत मराठी गाऊया हा सहावीच्या अभ्यासक्रमात आणि गोवा राज्याने त्यांचे बालनाटक वाचणारी डोकी हवीत हे पाचवीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे. तसेच महाराष्ट्रातील चार विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांतही त्यांच्या साहित्याची निवड झाली आहे. याच कार्यक्रमात प्रा. बिभीषण मद्देवाड यांनाही सन्मानित करण्यात आले. रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान, पत्रकारिता, साहित्य संमेलन, राज्य साहित्य-संस्कृती मंडळाच्या कार्यक्रमांपासून विविध आरोग्य शिबिरे, मुलींच्या नावाने केलेले एफडी, शिक्षक साहित्य संमेलन, राष्ट्रीय लघुपट महोत्सव, पर्यावरण पूरक उपक्रम, पथनाट्याद्वारे मतदार जाणीव जागृती अशा क्षेत्रात त्यांच्या बहुप्रकारच्या सेवेमुळे ते परिचित आहेत. त्यांच्या या समर्पित कार्याबद्दल मराठी विभागाकडून त्यांचाही सत्कार करण्यात आला.

# आ. निलंगेकरांनी घेतला शहरातील विकास कामांचा व विविध प्रश्नांचा आढावा...

## विकासकामे तातडीने पूर्ण करा; वीज व पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचे संबंधितांना निर्देश



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १५ जुलै : निलंगा शहरातील सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा, पाणीटंचाईवरील उपाययोजना तसेच आगामी पावसाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर आवश्यक नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी निलंगा नगरपरिषद सभागृहात सोमवारी दि. १३ जुलै रोजी माजी मंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा व नियोजन बैठक पार पडली.

बैठकीत शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, पावसाळी उपाययोजना, सुरू असलेली विकासकामे तसेच आगामी उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांनी नगरपरिषदेमार्फत पूर्ण झालेली तसेच प्रगतीपथावरील विविध विकासकामांची माहिती सादर करत आगामी कामांचा आराखडाही आमदार निलंगेकर यांच्यासमोर मांडला.

यावेळी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी शहरात विविध ठिकाणी सुरू असलेली रस्त्यांची कामे पावसाने थोडी उसंत दिल्याचा लाभ घेत तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. अन्यथा मुसळधार पावसामुळे कामे अपूर्ण राहण्याबरोबरच नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पावसाळ्यात शहरातील वीज व पाणीपुरवठा अखंडित आणि सुरळीत राहण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शहरातील मूलभूत सुविधांबाबत कोणतीही कुचराई होऊ नये, विकासकामांचा दर्जा राखून ती वेळेत पूर्ण व्हावीत आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे, असेही आमदार निलंगेकर यांनी बैठकीत नमूद केले.

बैठकीस नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, उपनगराध्यक्ष आशाताई फुलारी, गटनेते विरभद्र स्वामी, सभापती पुजाताई मोहोळकर, सुधाताई वाघमारे, सोनालीताई हाडोळे, विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक अजित नाईकवाडे, ईश्र्वर पाटील, हरीभाऊ सगरे, प्रा डॉ गजेंद्र तरंगे, सिराज देशमुख, मुख्याधिकारी संतोष लोमटे, बांधकाम अभियंता ऐश्र्वर्याताई म्हामाने, सर्व सभापती, नगरसेवक तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बेकायदेशीर मुरूम काढल्यामुळे गावाला धोका, तात्काळ कार्यवाही करावी




तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १५ जुलै : निलंगा तालुक्यातील मौजे- नणंद येथील घाडगे नगर वस्तीच्या पश्र्चिमेस देवसाळे यांच्या शेताला लागून पाझर तलाव आहे. त्या तलावातील पाळूला लागूनच पन्नास फूट अंतरावरच दोन पोकलेन व २५ हायवाच्या साह्याने मागील एक महिन्यापासून मुरूम काढणे सुरू आहे. या संदर्भात जलसंधारण अधिकारी शेलार यांना फोनद्वारे माहिती दिली असता त्यांनी तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले आहे.पाळूला चिटकून मुरूम काढल्यामुळे भविष्यात पाणी जास्त थांबल्यास पाझर तलाव फुटण्याची शक्यता आहे. पाझर तलाव फुटल्यास घाडगे नगर वस्तीमध्ये पाणी शिरून घरे वाहून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे बेकायदेशीर मुरूम काडून २३८ राज्य महामार्गावर मरूम टाकणाऱ्या गुत्तेदारावर तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी जलसंधारण अधिकारी शेलार व तहसीलदार साहेब यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची निवड

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ जुलै : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी माजी मंत्री आमदार आ. संजय बनसोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अनुयायी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाला आवाज दिला. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी दरवर्षी जयंती महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाच्या महोत्सवाचे नियोजन अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात करण्यासाठी आ. संजय बनसोडे यांच्या नेतृत्वावर समितीने विश्र्वास व्यक्त केला आहे.



समितीच्या बैठकीत विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन, भव्य मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधनपर व्याख्याने, गुणवंत विद्यार्थी व समाजातील उल्लेखनीय व्यक्तींचा सत्कार तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत चर्चा झाली.

यावेळी आ. संजय बनसोडे यांनी समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानत सांगितले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे आहेत.

जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने रहावे असे आवाहन त्यांनी केले.

आ. संजय बनसोडे यांच्या अध्यक्षपदी निवडीमुळे यंदाचा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव अधिक उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख पद्धतीने पार पडेल, असा विश्र्वास समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# पंचायत समितीबाबत कोणतीही तक्रार थेट माझ्याकडे करा; प्रत्येकाला निष्पक्षपणे न्याय देऊ : सभापती जयश्री नागरगोजे



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १५ जुलै : चाकूर पंचायत समितीच्या कामकाजाबाबत कोणत्याही नागरिकाला तक्रार अथवा अडचण असल्यास ती थेट माझ्याकडे नोंदवावी. प्रत्येक तक्रारीचे निष्पक्षपणे निराकरण करून सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचे काम आम्ही सर्व लोकप्रतिनिधी करू, असे आवाहन पंचायत समितीच्या सभापती जयश्री मच्छिंद्र नागरगोजे यांनी केले.

चाकूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. मागील काही दिवसांपासून पंचायत समितीतील कथित भ्रष्टाचाराबाबत समाजमाध्यमांवर विविध आरोप होत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर ही पत्रकार परिषद घेण्यात आली.

सभापती जयश्री नागरगोजे म्हणाल्या, पंचायत समितीबाबत होत असलेले भ्रष्टाचाराचे आरोप पूर्णपणे निराधार आहेत. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वीच्या प्रशासक काळातील बाबींचा संबंध आमच्याशी जोडला जात आहे. पंचायत समितीच्या कामकाजात शिस्त आणण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही समस्या असल्यास सभापती, उपसभापती किंवा पंचायत समिती सदस्यांशी थेट संपर्क साधावा. त्यांच्या समस्यांचे प्रामाणिकपणे निराकरण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व इतर नेत्यांवर करण्यात येणाऱ्या आरोपांबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, ज्यांच्याकडे आरोपांचे ठोस पुरावे असतील त्यांनी ते समोर आणावेत. अन्यथा अशा बिनबुडाच्या आरोपांना कोणताही अर्थ उरत नाही.

यावेळी उपसभापती भुजंग शिंदे यांनीही पंचायत समितीच्या कामकाजाबाबत भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, पंचायत समितीच्या प्रशासनात शिस्त आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. गटविकास अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळेच त्यांच्या विरोधात अविश्र्वास ठराव मंजूर करण्यात आला आहे. लवकरच नवीन गटविकास अधिकारी रुजू होतील आणि नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण केले जाईल.

काही राजकीय नेत्यांनी विशिष्ट व्यक्तींचीच बिले काढल्याचा आरोप केल्याबाबत शिंदे म्हणाले, असा एकही लाभार्थी त्यांनी दाखवावा, ज्याचे बिल आम्ही नियमबाह्य पद्धतीने काढले आहे. उलट आरोप करणाऱ्या पक्षातील कार्यकर्त्यांच्या शिफारशीनुसार अनेकांची प्रलंबित बिले अदा करण्यात आली असल्याचे उपसभापती भुजंग शिंदे म्हणाले.

# विठुरायाच्या दर्शनासाठी लातूररोड – उदगीर – बीदर मार्गे अकोला पंढरपूर विशेष रेल्वे धावणार



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ जुलै : आषाढी एकादशीला विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे जाण्याकरिता विठ्ठलभक्ताची गर्दी लक्षात घेऊन प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही दक्षिण मध्य रेल्वेने पंढरपूर करीता आषाढी एकादशी विशेष गाडी चलविण्याचे ठरविले आहे. रेल्वे क्र. ०७६३५ अकोला - पंढरपूर शुक्रवारी २४ जुलै २०२६ रोजी सुटणार आहे.

या प्रवासात दोन्ही दिशेला हिंगोली, परभणी, परळी वैजनाथ, लातूर रोड, उदगीर, भालकी, बिदर, झहीराबाद, विकाराबाद,कलबुर्गी, सोलापूर, पंढरपूर हे प्रमुख थांबे असतील. शनिवारी सकाळी ११:०० वाजता अकोला येथून सुटून ही रेल्वे लातूररोड येथे रात्री ७:४५,उदगीर येथे रात्री ८:२५ भालकी येथून ९:१७ मिनिटांनी तर बिदर ९:५० ला येईल तर पंढरपूर येथे २५ जुलैला सकाळी ८:१५ मिनिटांनी पोहचेल.

परतीच्या प्रवासात शनीवारी दुपारी ३:५० वाजता पंढरपूर - अकोला विशेष रेल्वे संख्या ०७६३६ निघेल ती बीदर येथे पहाटे ३:१०,भालकी येथे ४:२०, उदगीर येथे ५:४० तर लातूर रोड येथे ६:४५ असे थांबे घेत अकोला येथे रवीवारी दुपारी ४ वाजून ५० मिनिटांनी पोहचेल असे रेल्वे प्रशासनाने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

उदगीर मार्गे अकोला ते पंढरपूर ही गाडी सुरु होण्यासाठी उदगीर रेल्वे संघर्ष समितीने खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संजय बनसोडे यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला असल्याची माहिती संघर्ष समितीचे सचिव मोतीलाल डोईजोडे यांनी दिली आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या विशेष रेल्वेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ जुलै : येथील अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालयातील कु. वेदांत रमेश पाटणकर हा विद्यार्थी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत १८२ गुण घेऊन शिष्यवृत्तीस पात्र ठरला आहे.

त्याच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्षा प्रा.मैनाताई साबणे, उपाध्यक्ष श्री तुकाराम साबणे , शाळेचे मुख्याध्यापक श्री सचिन साबणे , सौ नीलम साबणे,सौ सुरेखा पालिमकर, माधव खिंडे, तुळशीराम पळ नाटे, पांडुरंग देवकते, लक्ष्मीकांत येवरे तसेच शाळेतील सर्व शिक्षक यांच्यातर्फे कु. वेदांत पाटणकर याचा शाल -पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.

अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालयाच्या यशाची उज्वल परंपरा आहे ,मागील वीस वर्षापासून इयत्ता दहावीचा निकाल ९५% पेक्षा जास्त आहे; तसेच या शाळेतील अनेक गुणवंत विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवून उच्च पदावर गेलेली आहेत. शाळेच्या या यशाबद्दल परिसरातील सर्व नागरिक व पालक यांच्याकडून शाळेच्या यशाचे कौतुक केले जात आहे.

# बोगस बियाणाची भरपाई द्या अन्यथा शेतकऱ्यांचा आत्मदहन करण्याचा इशारा



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १५ जुलै : चाकूर तालुक्यातील शेतकरी व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे यांनी शेतकरी यांना सोबत घेऊन महाबिज ५१२ व ३३५ हे बियाणे पेरणी केली होती पण हे बियाणे उगवलीच नाही त्यामुळे शेतकरी व मनसेचे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे यांनी कृषी तालुका अधिकारी शिवचंद्रपाल जाधव यांची भेट घेतली व तालुका कृषी कार्यालयाला कुलूप लावण्यासाठी शेतकरी कार्यालयात गेले असता कृषी अधिकारी जाधव यांनी तत्काळ पंचनामा करण्यासाठीं नेमन्यात आलेली कमीटी बोलावून पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी प्रयत्न केले व ठरल्याप्रमाणे शेतकरी यांना काहीच हालचाल दिसत नसल्याने ता.१३ जुलै रोजी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले व कृषी तालुका अधिकारी यांना हे निवेदन देण्यात आले व २० तारखेपर्यंत जर शेतकरी यांना हेक्टरी चाळीस हजार नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा २० जुलै रोजी कृषी कार्यालया समोर समस्त शेतकरी व मनसेचे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे,शिवसेना तालुकाप्रमुख निलेश मद्रेवार यांनी आत्मदहणाचा इशारा दिला यावेळी शेतकरी यांनी निवेदन दिले

यावर भागवत शंकरे,रामेश्र्वर गादगे,बालाजी कोठावळे,रमेश पाटील,विलास शेवाळे, राजु काचे,नागनाथ भुरे, अशोक रत्नपारखे, माधव उळागड्डे,विनायक बेल्लाळे, शिवानंद बेल्लाळे, नागनाथ बेल्लाळे,नायगाव येथील शेतकरी माधव सिरसाठ सह मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

# अनसरवाडा येथील पिडीत कुटुंबाला माजी जि. प. सदस्य सुभाषराव जाधव यांच्याकडून आर्थिक मदत




तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १५ जुलै : तालुक्यातील अनसरवाडा येथे कर्जबाजारीपणा आणि त्यातच बँक व खाजगी सावकाराच्या तगाद्याला कंटाळून अल्पभूधारक शेतकरी गुणवंत माने यांनी काही दिवसांपूर्वी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली होती. या अत्यंत दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असतानाच, संकटसमयी माने कुटुंबाच्या मदतीला माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव जाधव धावून गेले आहेत. त्यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन त्यांना धीर देत रोख आर्थिक मदत सुपूर्द केली. त्यांच्या या संवेदनशीलतेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

निलंगा तालुक्यातील आनसरवाडा येथील गुणवंत माने हे अल्पभूधारक शेतकरी होते. सततची नापिकी आणि शेतीतील तोट्यामुळे त्यांच्यावर बँक आणि खाजगी सावकारांचे मोठे कर्ज झाले होते. गेल्या काही दिवसांपासून या कर्जाच्या वसुलीसाठी त्यांच्याकडे तगादा लावला जात होता. या मानसिक जाचाला आणि सततच्या चिंतेला कंटाळून अखेर माने यांनी टोकाचे पाऊल उचलत गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पश्र्चात मागे वृद्ध पत्नी सुना नातवंडे असा परिवार असून, कुटुंबाचा मुख्य आधार हरपल्याने हे कुटुंब पूर्णपणे उघड्यावर आले आहे.

या हृदयद्रावक घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव जाधव यांनी तात्काळ आनसरवाडा गावाला भेट दिली. त्यांनी माने यांच्या शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा विश्र्वास दिला. केवळ सांत्वन न थांबता, जाधव यांनी कुटुंबाला तत्पर आर्थिक मदत केली. तसेच भविष्यातही या कुटुंबाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्र्वासन दिले.

एका कष्टकरी शेतकऱ्याचा असा अंत होणे अत्यंत वेदनादायी आहे. शासन स्तरावरून या कुटुंबाला भरीव मदत मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या कठीण काळात समाज म्हणून आपण सर्वांनी अशा कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे.

सुभाषराव जाधव (माजी जिल्हा परिषद सदस्य) माने कुटुंबाला ऐन संकटसमयी आधार दिल्याने आणि तत्परतेने मदतीचा हात पुढे केल्याने संपूर्ण निलंगा तालुक्यातून सुभाषराव जाधव यांच्या या दातृत्वाचे आणि संवेदनशीलतेचे कौतुक केले जात आहे.

यावेळी विशाल जोळदापके माधव पिटले नयन माने सचिन पवार प्रवीण धानोरकर शंकर पोद्दार अजित उसनाळे आदी उपस्थित होते.

# जीर्ण विजतारा तातडीने बदला; नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आ. निलंगेकर यांच्याकडे निवेदन

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १५ जुलै : शिरूर अनंतपाळ शहरातील अंतर्गत वीज वितरणाच्या जुन्या व जीर्ण झालेल्या विद्युत तारा तातडीने बदलून नवीन व सुरक्षित वीजवाहिनी बसविण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चे माजी शहराध्यक्ष संदीप धुमाळे यांनी माजी मंत्री तथा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक भागांतील वीज वितरणाच्या तारा अत्यंत जुन्या झाल्या असून अनेक ठिकाणी त्यावरील संरक्षक कव्हर निघाले आहे. काही ठिकाणी तारा सैल लटकलेल्या अवस्थेत असल्याने शॉर्टसर्किट होणे, ठिणग्या पडणे, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे अशा घटना घडत आहेत. विशेषतः पावसाळ्यात या जीर्ण तारांमुळे नागरिकांच्या जीवितासह मालमत्तेलाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्र्वभूमीवर शहरातील सर्व जीर्ण व धोकादायक वीजतारा तातडीने बदलून नवीन व सुरक्षित वीजवाहिनी बसविण्यासाठी महावितरण विभागाला आवश्यक सूचना देऊन संबंधित कामाला त्वरित मंजुरी द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सीना-माढा बोगद्यातून तात्काळ पाणी सोडण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ जुलै -**

उजनी धरणात सुमारे ५० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा उपलब्ध असूनही सीना-माढा बोगद्यातून अद्याप पाणी सोडण्यात आलेले नसल्याने परंडा तालुक्यासह धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिक गंभीर अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप करून सीना-माढा बोगद्यातून पाणी सोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार राहुल मोटे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात रब्बी हंगामातील पिके पाण्याअभावी वाळत असल्याचे, अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याचे तसेच जनावरांच्या चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे नमूद करण्यात आले आहे.

शेतकरी आणि नागरिकांच्या हितासाठी सीना-माढा बोगद्यातून तात्काळ पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



# येडशी-बार्शी-कुर्डुवाडी-टेंभुर्णी महामार्ग चौपदरीकरणाला गती

### डीपीआरला तीन महिन्यांत मंजुरी; त्यानंतर तातडीने निविदा व कामाला प्रारंभ : मंत्री गडकरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**

येडशी-बार्शी-कुर्डुवाडी-टेंभुर्णी या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालाला (उ्झठ) पुढील तीन महिन्यांत मंजुरी देण्यात येईल. त्यानंतर तातडीने निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याची माहिती आमदार तथा एमआयडीसीचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.



दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि राजाभाऊ राऊत यांनी भेट घेऊन या मार्गाच्या चौपदरीकरणासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले. डीपीआरला तातडीने मंजुरी देऊन प्रशासकीय मान्यता, आवश्यक निधी आणि कामाला लवकर प्रारंभ करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनात धाराशिव जिल्हा हा मराठवाड्याचे प्रवेशद्वार असून तुळजाभवानी मंदिरामुळे राज्यातील प्रमुख धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून ओळखला जातो. तसेच आकांक्षित जिल्हा म्हणून विविध विकास प्रकल्पांना गती मिळत असल्याने सक्षम दळणवळण व्यवस्था उभारणे अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले.

टेंभुर्णी-लातूर हा मार्ग पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कर्नाटकला जोडणारा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. टेंभुर्णी, कुर्डुवाडी, बार्शी, धाराशिव आणि लातूर या शहरांतील वाढती वाहतूक, कृषी व औद्योगिक विकास लक्षात घेता चौपदरीकरणाची गरज अधोरेखित करण्यात आली.

येडशी-लातूर टप्प्याचे काम सुरू असले तरी टेंभुर्णी-येडशी या उर्वरित मार्गाचेही चौपदरीकरण तातडीने करावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एनएच-५४८-सी अंतर्गत टेंभुर्णी-कुर्डुवाडी-बार्शी-कुसळंब तसेच एनएच-६३ अंतर्गत कुसळंब-येडशी या मार्गाच्या चौपदरीकरणासाठीचा डीपीआर पुढील तीन महिन्यांत मंजूर करण्यात येईल.

त्यानंतर त्वरित निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व राजाभाऊ राऊत यांनी सांगितले.

### येडशीतील विकासकामांनाही मंजुरी

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले की, येडशी येथे 'वन टाइम इम्प्रूव्हमेंट' योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ते, नाल्या, स्ट्रीट लाईट आदी मूलभूत सुविधा विकसित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित रस्ते राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे धाराशिव, सोलापूर आणि लातूर जिल्ह्यांतील नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून व्यापार, उद्योग, शेती, धार्मिक पर्यटन आणि एकूणच प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## १०० टक्के अनुदानावर तेरखेड्यात मोफत मका बियाण्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ जुलै -**

**शासनाच्या योजनेचा शेतकऱ्यांना दिलासा**

वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटातील शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर मोफत मका बियाण्यांचे वाटप मंगळवारी (दि. १५ जुलै) तेरखेडा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे सदस्य विकी चव्हाण यांच्या हस्ते शेतकऱ्यांना मका बियाण्यांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास पशुवैद्यकीय अधिकारी पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी तेरखेडा गावचे उपसरपंच कलाम पठाण, भाजपचे सुधीर घोलप, तसेच शेतकरी अर्जुन कचरे, बापू जिरेकर, बबलू मोहिते, मनोज जोशी, नाना खामकर, कृष्णा माळी आणि रामलिंग शिंदे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

शासनाच्या या योजनेमुळे खरीप हंगामात मका लागवडीस चालना मिळणार असून आर्थिकदृष्ट्या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार असल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# धाराशिवात विकासकामांची आ. कैलास पाटील यांनी केली पाहणी

### अर्धवट नालीचे कामही लवकर पूर्ण करण्याच्या सूचना...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**

धाराशिव शहरातील गणेशनगर, प्रभाग क्रमांक १९ येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी काही कामांच्या गुणवत्तेबाबत गंभीर त्रुटी निदर्शनास आल्याने संबंधित यंत्रणेला तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.





नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना विकासकामांचा दर्जा उंचावण्याचे, सर्व तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करण्याचे तसेच गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ न देण्याचे निर्देश देण्यात आले.

नागरिकांच्या कराच्या पैशातून होणारा प्रत्येक खर्च दर्जेदार व पारदर्शक पद्धतीने व्हावा, यावर भर देण्यात आला.

यानंतर धाराशिव-तुळजापूर मार्गावरील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असलेल्या अर्धवट नालीच्या कामाचीही पाहणी करण्यात आली.

संबंधित अधिकाऱ्यांना हे काम तातडीने पूर्ण करण्याचे, दर्जेदार साहित्याचा वापर करण्याचे तसेच कामामुळे नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला. प्रत्येक विकासकाम गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण झालेच पाहिजे. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले.

या पाहणीवेळी युवासेना जिल्हाप्रमुख रवी वाघमारे, नगरसेवक पंकज पाटील, राज निकम, तानाजी जाधवर, अमित उंबरे, बाळासाहेब पोतदार, महेश गंगणे, मनोज जाधव, अक्षय खळदकर, दादा पाटील, डॉ. कुलकर्णी, साखरे आप्पा, भोसले तसेच उबाठा गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आवाहनाला प्रतिसाद धाराशिव बसस्थानक परिसरात वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जुलै -**

राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त दिलेल्या झाडे लावा, झाडे जगवा या आवाहनाला प्रतिसाद देत धाराशिव शहरातील नूतन मुख्य बसस्थानक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विभाग नियंत्रक अजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.



एसटी महामंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण अभियानाचा हा एक भाग होता. पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविणे, बसस्थानक परिसर अधिक हिरवागार करणे आणि एक कर्मचारी - एक वृक्ष हा संकल्प प्रत्यक्षात आणणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे विभाग नियंत्रक अजय पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमास विभागीय वाहतूक अधिकारी मथुरा जाधवर, विभागीय अभियंता राहुल पवार, विभागीय वाहतूक अधीक्षक संतोष कोष्टी, आगार व्यवस्थापक प्रवीण भोंडवे, स्थानक प्रमुख मुकेश कोमटवार, वाहतूक निरीक्षक याहिया काझी यांच्यासह परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गावाच्या चार प्रमुख मागण्यांसाठी अणदूरमध्ये युवकांचे ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१५ जुलै -**



**मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच; ग्रामस्थांचा पाठिंबा**

अणदूर येथील युवकांनी गावाच्या हिताशी संबंधित चार प्रमुख मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन सुरू केले असून, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलनाचे प्रमुख रवी मुळे यांनी व्यक्त केला आहे.

युवा ग्रामस्थांनी ग्राम पंचायत प्रशासनाला दिलेल्या निवेदनात ग्रामदैवत श्री खंडोबा मंदिर परिसराची स्वच्छता करणे, राष्ट्रीय महामार्गावरील पुलाखालील अतिक्रमण व थांबणारी वाहने हटविणे, शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणाऱ्या मोकाट डुकरांचा तातडीने बंदोबस्त करणे तसेच गावातील बेकायदेशीर दारूविक्री त्वरित बंद करणे अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

ग्रामपंचायत प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली असून या आंदोलनाला ग्रामस्थांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या आंदोलनात रवी मुळे, राजकुमार गाढवे, आण्णा महाराज घोडके, आकाश अलकुंटे, अमोल महाबोले, योगेश जाधव, रामेश्वर आलुरे, संदीप धुमाळ, गणेश नरे, परमेश्वर आलुरे, रोहन दुधाळकर यांच्यासह अनेक युवकांनी सहभाग नोंदविला आहे.

## वारंवार वीजखंडितीने येरमाळा परिसरातील नागरिक त्रस्त

### ४८ तासांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास महावितरण कार्यालयाला टाळे ठोक आंदोलनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ जुलै -**

येरमाळा व परिसरातील ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) येरमाळा उपविभागाला ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देऊन तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, विदर्भातून पंढरपूरकडे जाणाऱ्या अनेक पायी वारकरी दिंड्या येरमाळा मार्गे प्रवास करतात आणि अनेक दिंड्यांचा मुक्काम येरमाळ्यात असतो. मात्र, रात्रीच्या वेळी सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने वारकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

याशिवाय शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही विपरीत परिणाम होत असून, सार्वजनिक पाणीपुरवठा योजनाही विस्कळीत झाल्या आहेत. परिणामी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. येरमाळा हे महत्त्वाचे केंद्र असूनही या गंभीर समस्येकडे महावितरण प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. येत्या ४८ तासांत वीजपुरवठा नियमित व सुरळीत न झाल्यास महावितरण कार्यालयाला टाळे ठोक आंदोलन करण्यात येईल आणि त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीला महावितरण प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला.

या निवेदनावर राहुल पाटील, लहु बारकुल, नदीम मुलाणी, अशोक साळुंके, शरद बारकुल, दत्ता कसपटे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### वारकऱ्यांचीही गैरसोय

याबाबत ग्रामस्थ राहुल पाटील म्हणाले, येरमाळा मार्गे दरवर्षी विदर्भातून पंढरपूरकडे जाणाऱ्या हजारो वारकरी दिंड्यांचे ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेने स्वागत करतात. वारकऱ्यांसाठी चहा, नाश्ता, भोजन व मुक्कामाची व्यवस्था केली जाते. मात्र, वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे वारकरी आणि स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणने तातडीने वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

## माणकेश्वरमध्ये शेतकरी संवाद दौरा; शिवस्मारकासाठी पाच लाखांचा निधी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ जुलै -**

तालुक्यातील माणकेश्वर येथे भाजपचे नेते मल्हार पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी संवाद दौरा आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ तसेच भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी शेतरस्ते, पीकविमा, रखडलेले अनुदान आणि गावातील विविध विकासकामांबाबतच्या समस्या मांडल्या. यावर लवकरात लवकर मार्ग काढण्याचे आश्वासन मल्हार पाटील यांनी दिले. तसेच शेतरस्त्याच्या कामास तातडीने मुरूम टाकून सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी माणकेश्वर येथील शिवस्मारकाच्या सुशोभीकरणासाठी पाच लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच मेहबूब सुभानी दर्ग्यास तीर्थक्षेत्र निधीतून सभागृह व शौचालय, हिंदू स्मशानभूमीस संरक्षण भिंत व सुशोभीकरण तसेच मारुती मंदिर ते स्मशानभूमीपर्यंत स्ट्रीटलाईट उभारण्याचे आश्वासनही देण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन भाजप कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांनी केले. यावेळी विशाल कोकणे, भाजपचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २१ टीएमसी पाणी योजना पूर्ण करा; पीक विमा शेतकरी हिस्सा १ रुपया करा

### भूम तालुका काँग्रेसचे मुख्यमंत्र्यांना निवेदन...

### सिंचन, पीक विमा व नुकसानभरपाईबाबत मागण्या...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ जुलै -**

तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शेतकरी व सिंचनाशी संबंधित विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम यांच्यामार्फत सादर करण्यात आले.



निवेदनात मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मंजूर असलेली २१ टीएमसी पाणी योजना तातडीने पूर्ण करून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. उजनी धरणातून मराठवाड्यासाठी राखीव असलेल्या २१ टीएमसी पाण्याचा लाभ भूम, परंडा, वाशी तसेच बीड व लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी भूम तालुक्यातील सर्व पाटबंधारे प्रकल्पांची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यंदा मराठवाडा व विदर्भात अत्यल्प पावसामुळे पिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांच्या पेरणीवरील खर्च वाया जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे राष्ट्रीय पीक विमा योजनेतील शेतकरी हिस्सा केवळ १ रुपया ठेवण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

तसेच, २०२५ च्या खरीप हंगामातील पीक विमा उतरविलेल्या अनेक शेतकऱ्यांना मोठे नुकसान होऊनही भरपाई मिळालेली नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विमा कंपन्यांनी बदललेल्या निकषांच्या आधारे नुकसानभरपाई नाकारल्याचा आरोप करत, प्रत्यक्ष नुकसानीचा विचार करून निकषांचे पुनर्निर्धारण करावे आणि बाधित शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी काँग्रेस कमिटीने केली आहे.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विलास शाळू, ॲड. सिराज मोगल, ॲड. मुशरफ सय्यद, सोपान वरवडे, मोईज सय्यद, ॲड. घनश्याम लावंड, महमूद पटेल, महादेव जाधव, बादशाह शेख, दत्तात्रय शिंदे, उत्तरेश्वर डोंबाळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माधवबाग'मधील मधुमेहावरील आयुर्वेद उपचारांचे संशोधन आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : माधवबाग प्रकाश नगर क्लिनिक, लातूर येथे टाईप-२ मधुमेहाच्या रुग्णांवर राबविण्यात आलेल्या संरचित आयुर्वेदिक उपचार पद्धतीच्या परिणामांचा अभ्यास करणारा संशोधन लेख ' ग्लोबल जरनल ऑफ फार्मा इनोव्हेशन ' या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित झाला आहे.

या संशोधनात डॉ. रोहित साने, डॉ. गुरुदत्त अमीन, डॉ. प्रवीण घाडीगावकर, डॉ. बिपीन गोंड यांच्यासह डॉ. स्वप्नील देशमुख व डॉ. अबरार सगरे यांनी लेखक म्हणून योगदान दिले आहे. या अभ्यासात लातूर येथील माधवबाग क्लिनिकमध्ये उपचार घेतलेल्या टाईप-२ मधुमेहाच्या ४६ रुग्णांच्या उपचारानंतरच्या नोंदींचे शास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे.

या संशोधनामध्ये बीएमआय - आधारित पंचकर्म उपचार, नियंत्रित कॅलरीयुक्त आहार आणि रुग्णानुसार वैयक्तिकृत आयुर्वेदिक औषधोपचार यांच्या एकत्रित परिणामांचे मूल्यांकन करण्यात आले. अभ्यासात उपचारानंतर *क्ल-१ल, रक्तातील साखरेचे प्रमाण (ठइड), वजन, इचख, पोटाचा घेर तसेच रक्तदाबामध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सुधारणा आढळून आली. तसेच, उपचारानंतर अनेक रुग्णांमध्ये मधुमेहावरील औषधांच्या मात्रेत अंशतः किंवा पूर्ण घट झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. या संशोधन लेखाच्या प्रसिद्धीबद्दल लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. अमीन, डॉ. घाडीगावकर, डॉ. गोंड, डॉ. देशमुख, डॉ. सगरे यांचे अभिनंदन केले आहे.



## विविध वृत्त....

# शहरातील सर्व इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करा

### स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांचे निर्देश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे एका इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १५ निष्पाप विद्यार्थ्यांचा होरपळून मृत्यू झाला होता. या अत्यंत दुर्दैवी आणि धक्कादायक घटनेनंतर आता लातूर शहर महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. स्थियी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी शहरातील सर्व खाजगी क्लासेस, महाविद्यालये, वसतिगृहे आणि व्यावसायिक इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करण्याचे कडक निर्देश अग्निशामक विभागाला दिले आहेत.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरून स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले यांनी तातडीची बैठक घेतली. लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. मात्र, लखनऊमधील दुर्घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भविष्यात लातूरमध्ये अशी कोणतीही दुर्दैवी घटना घडू नये, यासाठी महानगरपालिका ॲक्शन मोडमध्ये आली आहे.

स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी अग्निशामक दलाची विशेष बैठक घेऊन संपूर्ण शहरातील इमारतींचा आढावा घेतला. केवळ शैक्षणिक संस्थाच नव्हे, तर व्यावसायिक आणि निवासी इमारतींमधील नागरिकांचे प्राणही तितकेच मोलाचे आहेत.

# आरोग्य सेवांचा गुणात्मक दर्जा वाढवावा एकात्मिक आरोग्य वर्धिनी समिती आढावा बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांची सूचना

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : लातूर ग्रामीण मतदार संघात ९५% आयुष्यमान आरोग्य कार्डचे वितरण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून ग्रामीण भागातील जनतेला केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांच्या दर्जात गुणात्मक आणि परिणामकारक वाढ करावी, सुविधांचे बळकटीकरण व्हावे आणि आरोग्य विषयक उपक्रम लोकाभिमुख करावेत यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यरत राहावे अशी सूचना लातूर ग्रामीण विधानसभेचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी केली आहे.




राज्य शासनाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रासाठी आरोग्य विषयक नव्याने गठीत करण्यात आलेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली बैठक समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली १५ जुलै बुधवार रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.

या बैठकीस समिती सदस्य जि.प. महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पं.स. सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, लातूर पं.स. सभापती श्रीकांत बैले, जि.प. सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, सौ. छायाताई चिंचोलकर, सौ. राजश्री देशमुख, सौ. अश्विनी शिंदे, महादेव मस्के, सौ. सोनाली थोरमोटे, सौ. भागीरथी पाटील, सौ. दीप्ती आदमाने, जि.प. सां. बा. उप अभियंता सुभाष कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक सारडा, रेणापूर ग्रामीण रुग्णालय अधीक्षक सौ. ए. बी. अलगुले, बाभळगाव ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. एस. एस. बालकुंदे, मुरुड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजाभाऊ गलांडे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, औसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, समिती सचिव लातूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आर. एच. पवार, सहसचिव रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

लातूर ग्रामीण मतदार संघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, इमारतीची अवस्था, आरोग्याच्या सुविधा, प्रयोगशाळा, अधिकारी, कर्मचारी, आरोग्य सेविका, मनुष्यबळ, आयुष्यमान आरोग्य कार्ड, कुटुंब कल्याण योजना, स्वच्छतागृह, पाणीपुरवठा, रिक्त पदे याबाबतचा सविस्तर आढावा समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतला. आरोग्य सेविकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत त्याचबरोबर जीर्ण झालेल्या आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती आणि नव्याने इमारत बांधकाम यासाठी राज्याचे आरोग्य मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

जनतेचे आरोग्य सदृढ राहावे यासाठी आरोग्स सुविधा सक्षम असल्या पाहिजेत त्या साठी लागणाऱ्या भौतिक व सर्वप्रकारच्या सोयी सुविधा कमी पडू दिल्या जाणार नाहीत तेंव्हा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी समजून काम करावे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, अंगणवाडी, बालवाडी सह शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी बरोबरच वयोगट १४ ते १५ दरम्यानच्या मुलींना गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यासाठी जनजागृती करावी असे बोलून दाखवले.

या बैठकीत समिती सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या तर रेणापूर, लातूर तालुका आणि भादा सर्कलसह लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील आरोग्य यंत्रणा, सोयीसुविधेची सविस्तर माहिती संबंधित तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिली.

बैठकीचे सुत्रसंचलन आरोग्य सहा. प्रशांत शेटे यांनी केले.

या बैठकीस भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, शरद दरेकर, पांडुरंग बालवाड, भागवत सोट, अनिल भिसे, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेक जण होते. प्रारंभी समिती अध्यक्ष आणि सदस्यांचा आरोग्य विभागाच्या वतीने यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले.

# उड्डाण पुलाजवळील लोखंडी कमान पुन्हा जमीनदोस्त



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी अजब तोडगा काढला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाणारे रस्तेच चक्क बंद करुन टाकले आहेत. अवजड वाहने चौकात जाऊ नयेत म्हणुन उड्डाण पुल सुरु होतो तिथे ९ फुट १० इंच उंचीची कमान तिसऱ्यांदा उभी केली होती. तीही अज्ञात वाहनाच्या धडकेत जमीनदोस्त झाली आहे.

लातूर शहरातील वाहतूकीची समस्या सोडविण्यासाठी पोलिसांनी अघोरी प्रयत्न करत छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणारा मार्ग भुयारी मार्गापासून बंद केला, त्यानंतर

वाहतूक बंद असलेला उल्लेख कु ठेही नसल्याने मोठी वाहने भुयारी मार्गपर्यंत जायची व तिथून त्या वाहनाना रिवर्स घेऊन यावे लागायचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम होत होती. यावर उपाय म्हणून उड्डाण पुलाच्या सुरुवातीलाच लोखंडी कमान बसविण्यात आली. मात्र रात्रीच्या अंधारात मोठया वाहन धाराकांना ही कमान न दिसल्याने थेट कामानिवरच वाहन धडकून कमान तुटून खाली पडली. असा प्रकार एकदा नाही तर तीन वेळा घडला आहे.

## अवैध प्रवासी वाहतुकीच्या वाहनांची संख्या वाढली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : शहरात ऑटोरिक्षा, दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील रस्त्यांची रुंदी इतक्या वर्षांत कधीच वाढली नाही. वाढली ती वाहनांची संख्या. त्यामुळे सर्वच रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच आता भर पडली ती अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने ही वाहने भर रस्त्यात उभी राहात असल्याने वाहतूक कोंडीत अधिकची भर पडत आहे.

# इनरव्हील क्लब ऑफ लातूरचा पदग्रहण सोहळा उत्साहात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : इनरव्हील क्लब ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्वयंसेवी संघटना असून सामाजिक जाणिवेतून ही संघटना कार्यरत आहे. यामध्ये लातूर जिल्हा सुद्धा समाविष्ठ आहे. इनरव्हील क्लब ऑफ लातूर ही या आंतरराष्ट्रीय संस्थेची एक शाखा आहे. या क्लबचा सन २०२६-२७चा पदग्रहण सोहळा भालचंद्र ब्लड बँकेमध्ये मोठ्या उत्साहात झाला.

कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्षा चंद्रकला भार्गव, माजी विभागीय अध्यक्षा निर्मला सोमाणी, लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रेरणा होनराव, मावळत्या अध्यक्षा रेश्मा बोरा, नूतन अध्यक्षा शीला यादव, उपाध्यक्षा ज्योती वर्मा, कोषाध्यक्षा डॉ. प्रीती अग्रोया, संपादक डॉ. अश्विनी रोडे, उषा सचदेव, कार्यकारी सदस्या अनुराधा कडेल, ममता अग्रवाल, डॉ. स्वाती शेळके, संता लोया, अनुराधा बेळंबे, कुसुम अग्रवाल आदीची उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शक समिती गठीत करण्यात आली. माजी अध्यक्षा सुनीता अग्रोया, सुमित्रा गोरखे, मेघा अग्रोया आणि सारिका गांधी यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीला यादव यांनी केले, तर सूत्रसंचालन मेघा अग्रोया, डॉ. अश्विनी रोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार उत्कर्षा भालके यांनी मानले.

# महिलांसाठी मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात

तभा वृत्तसेवा



लातूर दि. १५ जुलै : महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने लातूरच्या विलासराव देशमुख फाउंडेशनकडून विविध उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील वेगवेगळ्या भागात महिलांसाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र सुरु केले जात आहेत. लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील महालक्ष्मी मंदिर परिसर, राचट्टे गल्ली, गांधी चौक यासह परिसरातील महिलासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १६ चा शुभारंभ सोहळा ट्वेन्टी वन ॲग्रो लि. च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या हस्ते दि. १४ जुलै रोजी दुपारी महात्मा गांधी चौकातील महालक्ष्मी मंदिर हॉल येथे झाला.

विलासराव देशमुख फाउंडेशन लातूरच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कौशल्य विकास उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सुरू करण्यात येणाऱ्या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रात महिलांना आधुनिक पद्धतीने शिलाईचे प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी देखील मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. या बोलताना ट्वेन्टी वन ॲग्रो लि. च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख म्हणाल्या की, महिलांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी या कौशल्याचा उपयोग करून त्यांच्यामध्ये आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशन काम करत आहे हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात येत आहे. आज पर्यंत विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून ७ हजारांपेक्षा अधिक महिलांना रोजगारभीमुख प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये शिलाई मशीन, ब्युटी पार्लर, इंग्लिश स्पोकन रिटेल सेल्स, केक तयार करणे अशा विविध कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात आले. याचा लातूर शहरातील व परिसरातील महिलांना उपयोग होत आहे.

त्याचबरोबर विलासराव देशमुख फाउंडेशन कडून व्ही. डी. एफ बाजार ही संकल्पना राबविण्यात येत आहे याच्या माध्यमातून शहरातील व शहरालगतच्या परिसरातील महिलांना एक हक्काची बाजारपेठ तयार करण्याचे काम विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून झाले आहे. या कार्यक्रमासाठी लातूर शहर महानगरपालिकेचे उपमहापौर ॲड. स्नेहल श्रीकांत उटगे, विलासराव देशमुख फाउंडेशन स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या विभाग प्रमुख श्रीमती संगीता मोळवणे, मनपा सदस्या श्रावणी बालाजी झिपरे, प्रज्ञा उटगे, रेहानाबेगम शेख, मनपा सदस्य अभिषेक पतंगे, यांच्यासह परिसरातील प्रशिक्षण घेणाऱ्या महिला, बचतगट सदस्य, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा सुनिल कच्छवे यांनी स्वीकारला पदभार




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा पदभार विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सुनिल कच्छवे यांनी आज स्वीकारला.

पदभार स्वीकारुन त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. विभागाच्यावतीने सहायक संचालक (माहिती) डॉ. श्याम टरके यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी लातूरचे प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, सहायक अधीक्षक अशोक माळगे, वरिष्ठ लिपिक मनिषा कुरूलकर, कनिष्ठ लिपिक कैलास लांडगे, शिपाई अशोक बोर्डे, शेख कलीम आदी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाने ०८ जुलै २०२६ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (माहिती), गट अ (वरिष्ठ) पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने त्यांची सरळसेवेने नियुक्ती केली आहे.

## ९० टक्के अनुदानावर मिळणार ठिबक आणि तुषार सिंचन ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ जुलै : जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांच्या शाश्र्वत विकासासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना (प्रति थेंब अधिक पीक) सन २०२६-२०२७ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर ठिबक व तुषार सिंचन योजनेची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या कल्याणकारी योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक तसेच बहुभूधारक अशा दोन्ही गटांतील पात्र शेतकऱ्यांना विविध उपयोजनांच्या माध्यमातून एकत्रितपणे एकूण ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. यामध्ये दोन हेक्टरपर्यंत शेतजमीन असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ५५ टक्के, मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजनेतून २५ टक्के पूरक अनुदान आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून उर्वरित १० टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्के अनुदान दिले जाईल. त्याचप्रमाणे दोन हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या बहुभूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ४५ टक्के, मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजनेतून ३० टक्के आणि संबंधित स्वावलंबी योजनांमधून १५ टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्के अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा प्रत्यक्ष शेतीत वापर केल्यामुळे पिकांच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत मोठी वाढ होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होणार आहे.

# डॉ. अजय जाधव यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : लातूरच्या बहुचर्चित शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अजय अनिरुद्ध जाधव यांची निवड झाल्याबद्द्ल त्यांचा नुकताच स्नेहीजनांच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने रिक्त झालेल्या संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अजय जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल डॉ. जाधव यांचा डॉ. हंसराज बाहेती, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. बालाजी गोमसाळे , ईश्र्वर बाहेती, डॉ. विद्यासागर बाहेती, जयप्रकाश दगडे, राजा कासट , वसंतराव पाटील आदी स्नेहीजनांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या सत्कारास उत्तर देताना डॉ. अजय जाधव यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर विश्र्वास दाखवून संस्थेच्या अध्यक्षपदावर काम करण्याची मोठी जबाबदारी आपल्यावर सोपविल्याबद्दल सर्वांप्रति आभार व्यक्त केले. आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी निश्र्चितच व्यवस्थितपणे पार पडण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करू. दिवंगत अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून यापुढेही संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण प्रयत्नशील राहू. सर्वांना सोबत घेऊन संस्थेच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही नूतन अध्यक्ष डॉ. अजय जाधव यांनी सांगितले. या निवडीबद्दल विविध स्तरातून डॉ.अजय जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.